



दैनिक

# अक्षराज

मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथून प्रसिद्ध

मुख्य संपादक : विनोद कैलास गोरे    Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

विचार करण्यासाठी वेळ द्या.
पण एकदा का कृती करण्याची वेळ आली
की, विचार करणे थांबवा...
आणि स्वतःला कार्यात झोकून द्या.


● वर्ष ०२ रे ● अंक ३४८ वा ● पाने ०४ ● किंमत : ३ रुपये | ठाणे, मंगळवार, दि.०७ ऑक्टोबर २०२५ | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023

● YEAR : 02 ● ISSUE : 348 ● PAGES : 04 ● PRICE RS. : 03 | THANE, Tuesday, 07 October 2025 | ● RNI NO.: MAHMAR/2022/82056 ● Declaration/SDM/SR.No.108/2023


## महाराष्ट्र ऑलम्पिक संघटनेच्या विरोधात संघटनांचा पुन्हा आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, पुणे :** महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या कारभारातील अनियमितता, शासकीय निधीच्या हिशोबास विलंब आणि खेळाडूंच्या सुविधांबाबत गंभीर तक्रारी केल्यानंतरही महाराष्ट्र ऑलम्पिकचे महासचिव नामदेव शिरगावकर यांच्यावर आतापर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यांच्यावर तातडीने कारवाई न केल्यास १० ऑक्टोबरला पुणे बालेवाडी येथे क्रीडा विभागाच्या कार्यालयाबाहेर आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी दिला आहे.

क्रीडा व युवकसेवा संचालनाचे सहसंचालक सुधीर मोरे यांनी महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनला २६ सप्टेंबरलाच पत्र पाठवून ३६,३७,३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेपूर्वी प्रशिक्षण शिबिरा बाबत माहिती मागवली आहे.तसेच या शिबिरात खेळाडूंना कोणकोणत्या सुविधा देण्यात आल्या. त्यांना दिलेल्या साहित्यांची किंमत, भोजन, खेळाडूंची माहिती, बँकांमधील माहिती मागविण्यात आली आहे. पण महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे महासचिव नामदेव शिरगावकर यांनी अद्याप कोणतीही माहिती सादर केलेली नाही. त्यामुळे या भ्रष्टाचाराची सविस्तर माहिती तातडीने द्यावी अशी मागणी विविध क्रीडा संघटनांनी केली आहे.

-----------------------------------

**महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेकडून अद्याप हिशोब सादर नाहीच**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या पत्रानुसार ३ ऑक्टोबरला सर्व माहिती सादर करणे आवश्यक होती. त्याबाबत 'एमओए'ला नोटीसही बजावण्यात आली होती.मात्र तरीही 'एम ओए' कडून कोणतीही माहिती सादर करण्यात आलेली नाही.

-----------------------------------

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून हस्तक्षेपाची शक्यता**

महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदिप भोंडवे म्हणाले की उपमुख्यमंत्री अजित पवार महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष असल्याने त्यांच्याकडून हस्तक्षेप होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नोटीसी प्रमाणे नामदेव शिरगावकर यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

## जीव घेणाऱ्या खोकल्याचं औषध कोल्ड्रिप सिरप प्रकरणात आरोग्यमंत्र्यांचा खुलासा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, कोल्हापूर :** भारतातील अनेक राज्यांमध्ये लहान मुलांसाठी धोकादायक ठरलेल्या कोल्ड्रिप कफ सिरपवर केंद्र आणि राज्यांनी तातडीने बंदी घालण्यास सुरुवात केली आहे. मध्यप्रदेश-राजस्थाननंतर महाराष्ट्रामध्ये देखील या औषधाविरोधात कठोर कारवाई सुरु आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी कोल्हापुरात माध्यम ांशी बोलताना खुलासा केला की, केंद्र सरकारच्या सुचनांनुसार कोल्ड्रिप सिरपच्या खराब आणि धोकादायक उत्पादनांवर प्रतिबंध घालण्याचं काम राज्य आरोग्य विभागाने आखले आहे.

काही कंपन्यांचे उत्पादन चुकीचं असल्याने सर्व सिरपवर संशय घेण्याचा आधार नाही. त्यामुळे केंद्राकडून आलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करत आहोत. काल केंद्रासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग झाली असून, त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या औषध नियंत्रण यंत्रणेने तातडीने प्रतिबंधात्म क उपाययोजना सुरू केल्या आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता गोष्टींचे गांभीर्य समजून काळजी घ्यावी, असं आवाहन आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं.




मध्यप्रदेश, राजस्थान आणि तमिळनाडूमध्ये कोल्ड्रिफ सिरपच्या वापरामुळे अनेक लहान मुलांच्या मृत्यूची घटना उघडकीस आल्यामुळे या उत्पादनावर प्रतिबंध लागू झाला आहे. महाराष्ट्रातही श्रीसन फार्मा कांचीपुरम येथे तयार होणाऱ्या विशेष बॅच SR-13 च्या विक्रीवर विशेष बंदी घालण्यात आली आहे. या बॅचमध्ये हानिकारक घटक डायथिलीन ग्लायकॉल (DEG) आढळल्याची तमिळनाडू सरकारच्या तपासणीत नोंद झाली आहे, अशी माहिती आरोग्य मंत्र्यांनी दिली.

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांविषयी भाष्य...**

राज्यात आगामी जिल्हा परिषद, महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकीची तयारी जोमाने सुरु आहे. या निवडणुकांमध्ये सर्व पक्ष कार्यकर्त्यांच्या सक्रियतेने सहभाग घेणार आहेत. त्यामुळे सर्व पक्ष तयारी जोमाने करणार आहेत. म हायुतीसह प्रमुख पक्ष कार्यकर्त्यांसाठी काम करणार आहेत, अशी प्रतिक्रिया प्रकाश आबिटकर यांनी दिली.

**सीपीआरमधील रुग्णांचा त्रास होईल कमी...**

कोल्हापूरमधील प्रमुख रुग्णालय छत्रपती प्रमिला राजे (सीपीआर)तील वैद्यकीय कर्मचाऱ्यांची कमतरता आणि वाढती रुग्णसंख्या यामुळे येणाऱ्या रुग्णांना त्रास होत असल्याबाबतही आरोग्यमंत्र्यांनी चिंता व्यक्त केली. शेंडापार्क परिसरात चालू असणाऱ्या नवीन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये १५० बेड वाढवण्याची योजना आहे, जी सुरू होईपर्यंत रुग्णांना काही प्रम ाणात अडचणी येतील, अशी माहिती त्यांनी दिली.

मराठवाड्यातील पूरग्रस्तांसाठी येणारी मदत कॅबिनेट बैठकीत लवकरच अंतिम रूप घेईल. आनंदाचा शिधा आणि पूरग्रस्तांसाठी मदतीचा मुद्दा संबंधित मंत्र्यांच्या जबाबदारीत असून, पुढील आठवड्यात निर्णय अपेक्षित आहे, असं आबिटकर यांनी सांगितलं. दरम्यान, केंद्र सरकारकडून मिळालेल्या सूचनांचे आम्ही पालन करत आहोत. त्यामुळे नागरिकांनी देखील घाबरुन न जाता सरकारी निर्देशांचे पालन करावे असे आवाहन कोल्ड्रिप कफ सिरपबाबत सामान्य नागरिकांना आवाहन आरोग्यमंत्री आबिटकर यांनी केलं आहे.

## पंचतारांकित हॉटेलमधील धक्कादायक घटना !

**दि.०६, कर्जत :** कर्जतमधील एका हॉटेलमध्ये एका तरुणाचा संशयास्पद मृत्यू झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. ओलियंडर सॉल्ट पंचतारांकित हॉटेलमध्ये हाऊसकीपिंग कर्मचाऱ्याचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. कर्जत चौक राज्यमार्ग रस्त्यावर असलेल्या सॉल्ट या पंचतारांकित हॉटेलमध्ये संशयास्पद मृत्यू झालेला हा तरुण काम करत होता.



**हॉटेलमध्ये कर्मचाऱ्याचा मृत्यू !**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कर्जत तालुक्यातील मांडवणे येथील समीर करवंदे (वय ३३) या कामगाराचा ओलियंडर सॉल्ट या पंचतारांकित आलिशान हॉटेलमध्ये मृत्यू झाला आहे. ही घटना ३ ऑक्टोबर रोजी दुपारी उघडकीस आली. सुमारे दीडशे एकर जागेत उभारलेल्या ओलियंडर सॉल्ट या आलिशान रिसॉर्टमध्ये समीर करवंदे हाऊसकीपिंग विभागात दीड वर्षांपासून कार्यरत होता. नेहमीप्रमाणे कामाच्या ठिकाणी तो काही साहित्य आणण्यासाठी आपल्या रूममध्ये गेला होता. मात्र काही वेळाने तो रूममध्येच मृत अवस्थेत आढळून आला.

त्याचा सहकारी एका कामानिमित्त तेथे गेला असता त्याच्या पायाखालची जमीनच सरकली. समीर जमिनीवर पडलेला दिसला. तातडीने त्याला उपजिल्हा रुग्णालय, कर्जत येथे हलवण्यात आलं. मात्र डॉक्टरांनी तपासूव त्याला मृत घोषित केलं.

**मृत्यूच्या कारणाचा शोध सुरू...**

समीर करवंदेचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाला, की अन्य काही कारणामुळे, याबाबत कोणतीही माहिती मिळालेली नाही. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचं नेमकं कारण समोर येईल, अशी माहिती डॉक्टरांनी दिली आहे. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच मृत समीर करवंदे यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने कर्जत उपजिल्हा रुग्णालयात दाखल झाले होते. त्यावेळी रुग्णालय परिसरात एकच गर्दी झाली होती. घटनेनंतर कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किरण नवले यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. पोलिसांनी प्राथमिक चौकशी सुरू केली असून अधिक तपास सुरू असल्याचं सांगण्यात आलं आहे. या घटनेमुळे पंचतारांकित सॉल्ट हॉटेलमध्ये खळबळ उडाली आहे. कामगाराच्या या मृत्यूचं नेमकं कारण काय? तरुणासोबत काय घडलं? याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

## पायाभूत सुविधांच्या विकासामुळे राज्यात गुंतवणुकीच्या अमर्याद संधी - मुख्यमंत्री

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, मुंबई :** राज्यात पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणात विकास करण्यात येत आहे. नवीन उद्योग सहज व कमी कालावधीत सुरू करण्यासाठी केलेल्या धोरणात्मक सुधारणांची अंमलबजावणी सुरू आहे. शासनाच्या या सर्व प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात गुंतवणुकीच्या अमर्याद संधी आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारांनी अधिकाधिक गुंतवणुक राज्यात करावी, असे आवाहन करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र हे देशातील गुंतवणुकीचे ' मॅग्नेट' ठरल्याचे सांगितले.



सह्याद्री अतिथीगृह येथे २०- २० गुंतवणूक संघटना शिष्टमंडळासोबत बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीस उद्योग मंत्री उदय सामंत, उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक, २०- २० गुंतवणूक संघटनेचे अध्यक्ष वेरा ट्रोजन उपस्थित होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, धोरणात्मक सुधारणा, पायाभूत सुविधांचा होत असलेला विकास यामुळे महाराष्ट्र हे देशाचे ' ग्रोथ सेंटर' बनले आहे. देशाच्या एकूण डेटा क्षमतेपैकी ६० टक्के डेटा क्षमता महाराष्ट्रात आहे. मुंबई ही देशाच्या आर्थिक राजधानीसोबतच मनोरंजन, स्टार्टअपचीसुद्धा राजधानी आहे.

जलसंपृक्त महाराष्ट्रासाठी जलयुक्त शिवार...

महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी राज्यशासन विविध योजना आणि उपक्रमांमधून काम करीत आहे. भूजल पातळी वाढविण्यासाठी लोकसहभाग असलेली जलयुक्त शिवार मोहीम राज्यात राबविण्यात आली आहे. या योजनेचे कार्यान्वयन टप्पा २ अंतर्गत करण्यात येत आहे. या योजनेमुळे राज्यात जवळपास २० हजार गावे दुष्काळमुक्त झाली. गावांच्या जलसंपृक्ती सोबतच शेतकरीही समृद्ध होत आहे. शेतकऱ्याला सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाल्यामुळे शेतकरी एक पिकांवरून वर्षाला दोन पिके घेत आहे. फलोत्पादन लागवड वाढली आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

**देशातील सर्वात मोठा नदी जोड प्रकल्प...**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात वैनगंगा ते नळगंगा देशातील सर्वात मोठ्या नदीजोड प्रकल्पाचे काम सुरू करण्यात येणार आहे. या प्रकल्पाचा अभ्यास पूर्ण झाला असून विस्तृत प्रकल्प अहवाल तयार आहे. यामुळे विदर्भ सुजलाम सुफलाम होणार आहे. ५०० किलोमीटरचा हा नदी जोड प्रकल्प आहे. यासोबतच राज्याला जास्तीत जास्त सिंचित करण्यासाठी पश्चिम घाटातून समुद्रात वाहून जाणारे पाणी उपसा सिंचनाद्वारे गोदावरी खोऱ्यात आणण्यात येणार आहे. गोदावरी खोऱ्यामध्ये पाण्याचा अनुशेष आहे. या माध्यमातून हा अनुशेष भरण्यात येईल. परिणामी येथील शेती, उद्योगांना मागणीनुसार पाणी उपलब्ध करून देता येईल. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण म हाराष्ट्र सिंचित होईल.

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात कौशल्य विकास प्रशिक्षण...

राज्य शासन उद्योग वाढीबरोबरच प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीसाठी काम करीत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीने मोठ्या प्रमाणावर कौशल्य विकासाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. भविष्याचा विचार करून कृत्रिम बुद्धिम त्ता क्षेत्रात कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यासाठी राज्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अशा प्रकारच्या प्रशिक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येत आहे. विविध क्षेत्रातील कौशल्य प्रशिक्षण देऊन नवीन क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मिती करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यात बंदरे, जहाज बांधणी व लॉजिस्टिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. धोरणात्मक सुधारणा करून या क्षेत्रांचा विकास करण्यात येत आहे. नवीन क्षेत्रांमध्ये अधिकाधिक रोजगार निर्मितीसाठी शासन काम करीत आहे.

**महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम...**

महिला सक्षमीकरणासाठी ड्रोन दीदी, लखपती दीदी यासारख्या योजना राबविण्यात येत आहे. महिला स्वयंसहायता बचतगट ही लोकचळवळ झाली आहे. यामुळे महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहे. शेतांवर फवारणी करण्यासाठी महिलांना ड्रोन दीदी उपक्रमाद्वारे प्रशिक्षितही करण्यात येत आहे. मागील वर्षी राज्यात १३ लाख महिला लखपती दीदी झाल्या असून यावर्षी २५ लाख महिला लखपती दीदी होणार आहेत.

**घरकुलाच्या योजनांची अंमलबजावणी...**

बेघरांना घरे देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर घरांची बांधणी करण्यात येत आहे. विविध योजनांच्या माध्यमातून बेघरांना घरकुल देण्यात येत आहे. पुढील वर्षाच्या शेवटपर्यंत ४० लाख घरांचे बांधकाम करण्यात येणार आहे. यासोबतच शहरांमध्ये परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येत आहे. मोठ्या शहरांमध्ये झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास सुरू करण्यात आलेला आहे. मुंबई शहरात जगातील सर्वात मोठा धारावी झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे.


**दर्जेदार शिक्षणावर भर...**

राज्यात दर्जेदार शिक्षण देण्यावर शासनाचा भर आहे. संपूर्ण राज्यात एक लाखपेक्षा जास्त शाळांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२० मध्ये नवीन शैक्षणिक धोरण आणले आहे. भविष्यातील आव्हाने, नवीन तंत्रज्ञान, जगासोबत असलेल्या स्पर्धेत पुढे जाण्यासाठी क्षमता निर्मिती या सर्व बाबींचा विचार करून नवीन शैक्षणिक धोरण आणण्यात आले आहे. राज्य शासनाने केंब्रिज विद्यापीठासोबत शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी करारही केला आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

बैठकीस मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ संजय मुखर्जी, प्रधान सचिव (नियोजन) सौरभ विजय, सचिव (उद्योग) पी. अनबळगण, सचिव (पर्यावरण) जयश्री भोज, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासु आदी उपस्थित होते.

## गुरं आणायाला गेली ११ वर्षांची चिमुकली; आजीच्या डोळ्यांसमोर मुलीचा करुण अंत

**दि.०६, माणगाव :** माणगाव तालुक्यात घडलेल्या दुर्दैवी घटनेत एका ११ वर्षीय चिमुक्लीचा मृत्यू झाला आहे. उंबर्डी गावच्या हद्दीत शनिवारी सायंकाळी काळ नदीत हा अपघात घडला आहे. अचानक वाढलेल्या पाण्याच्या प्रवाहामुळे ही दुर्घटना घडली असून, या घटनेने उंबर्डी गावासहीत तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.



**आजीसोबत राहायला आली होती उंबर्डीत...**

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार ही घटना माणगाव तालुक्यातील निजामपूर विभागातील जिते ग्रामपंचायत हद्दीतील उंबर्डी गावात शुक्रवारी (दि. ४ ऑक्टोबर) रोजी सायंकाळी घडली आहे. अश्विनी गेनू ढेबे (वय वर्षे ११) असे मृत बालिकेचे नाव आहे. ती उंबर्डी येथे आपल्या आजीकडे राहत होती. अश्विनी ही मूळची पुण्यातील गडले दूधवान ता. मुळशी येथे राहणारी होती. गुरे आणताना नदीपात्र ओलांडायला गेली अन्

अश्विनी आणि तिची आजी रोज सायंकाळी गुरे घेऊन उंबर्डी गावच्या हद्दीतील काळ नदीचे पात्र ओलांडून जात असत. शुक्रवारी सायंकाळी ४: ३० वाजण्याच्या सुमारास त्या दोघी नेहमीसारख्या जात असताना, काळ नदीतील पाण्याचा प्रवाह अचानक वाढला. त्यामुळे अचानक आश्विनीचा तोल गेला आणि ती नदी पात्रात पडली . यानंतर काही क्षणात ती पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली.


**उपचारादर्म्यान मुलीने घेतला अखेरचा श्वास...**

घटनेची माहिती मिळताच ग्राम स्थांनी तत्काळ शोधकार्य सुरू केले. काही वेळानंतर ती मुलगी बेशुद्ध अवस्थेत त्यांना सापडली. पाण्यातून बाहेर काढून मुलीला तातडीने माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, मध्यरात्री १.४० वाजता डॉक्टरांनी तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे सांगितले. घटनेची माहिती मि ळताच उपविभागीय पोलिस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी माणगाव पोलिस ठाणे येथे ४८/ २०२५ भा. ना. सु. सं. २०२३ चे कलम १९४ च्या प्रमाणे नोंद करण्यात आली असून पुढील तपास माणगाव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स. इ. जाधव करत आहेत.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नवी मुंबई :** भारतातील नगर नियोजन आणि विकास या क्षेत्रात अग्रणी असलेल्या सिडको प्राधिकरणाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल, असा सुदिन समीप आला असून येत्या बुधवारी, ८ ऑक्टोबर रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र म ोदी यांच्या हस्ते होणार आहे, त्यासाठी संपूर्ण प्रशासन सज्ज झाले आहे', अशी माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी शनिवारी दिली.





'पंतप्रधानांचे विमान बुधवारी दुपारी अडीचच्या सुमारास नवी मुंबई विमानतळावर उतरेल. त्यानंतर रन वे आणि टर्मिनल १ इमारतीची पाहणी केल्यानंतर पंतप्रधान उपस्थितांशी संवाद साधतील. उद्घाटनानंतर विमानतळ परिसर केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडे (सीआयएसएफ) सोपविला जाणार आहे. विमानतळावरून प्रत्यक्ष प्रवासी वाहतूक डिसेंबरपासून सुरू होईल', असे सिंघल यांनी सांगितले.

**विमानतळाची वैशिष्ट्ये...**

देशातील पहिले ग्रीनफील्ड विम ानतळ दरवर्षी नऊ कोटी प्रवासी वहन क्षमता ३५० विमाने पार्किंग करता येतील साडेतीन किमीहून अधिक लांबीच्या दोन धावपट्ट्या दुहेरी समांतर टॅक्सी वे, जलद एक्झिट टॅक्सी वेद्वारे जोडणी १५०० गाड्या, २० बस आणि २० ट्रकसाठी पार्किंग सुविधा सात कार्गो स्टँड, ३८ जनरल एव्हिएशन स्टँड

**मल्टिमोडल विमानतळ !**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ राष्ट्रीय महामार्ग , मुख्य शहरी रस्ते, उपनगरीय रेल्वे, मेट्रो व जल वाहतुकीद्वारे जोडले जाणार आहे. जल वाहतुकीद्वारे जोडले जाणारे हे देशातील पहिले विमानतळ ठरणार आहे. नवी मुंबई विमानतळाला मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रत्येक कोपऱ्याशी जोडण्यासाठी एक अखंड मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट नेटवर्क विकसित केले जात आहे.

## दगडाने मारुन मित्राची निर्घृण हत्या; रायगड हादरलं

**दि.०६, रायगड :** उसने दिलेले पैसे परत मागितले म्हणून राग येऊन हत्या करण्याच्या अनेक घटना रायगड जिल्ह्यातील अलिबाग सहित महाराष्ट्रात आणि देशभरात घडल्या आहेत. अशा घटनांमध्ये, पैसे परत मागण्याचा राग आल्यामुळे हल्ला करून खून केल्याच्या घटना घडल्या आहेत. अशीच एक घटना रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातून समोर आली आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यांमधील देवकान्हे येथे हात उसने दिलेले पैसे परत मागितले याचा राग येऊन मित्राचा खून करून फरार झालेला आरोपी यास भारत नेपाळ सीमेवरून ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी याचे नाव अख्तर हबीब बैठा (रा. वॉर्ड नं.३, गांव-पिरोखर, जि. मधुबनी, राज्य-बिहार) असे या आरोपीचे नाव आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, खालापूर तालुक्यातील खोपोलीजवळील देवन्हावे गावात सुशांत चौधरी यांच्या भाड्याचच्या खोलीत आरोपी अख्तर हबीब बैठा (रा. वॉर्ड नं.३, गांव-पिरोखर, जि. मधुबनी, राज्य-बिहार) त्याचा मित्र मयत पारस हरिहर सिंग (वय ५० वर्षे , रा. वॉर्ड नं. ३, खैरवा, पो. मणियारी, तहसील-डु तामढी, बिहार) यांच्यासोबत राहत होता. दि. ११ सप्टेंबर २०२५ रोजी खोपोलीजवळील देवन्हावे गावात अख्तर हबीब बैठा, (रा. वॉर्ड नं. ३, गांव-पिरोखर, जि. मधुबनी, राज्य-बिहार) याने कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन कशाने तरी गुन्हयातील मयत पारस हरिहर सिंग (वय, ५० वर्षे, रा.वॉर्ड नं. ३, खैरवा, पो. मणियारी, तहसील-डुमरा, जि. सितामढी, बिहार) यांचे डोक्याचे मागील बाजुस कशाने तरी मारुन गंभीर दुखापत करुन जखमी केले व त्याच्यावर औषधोपचार न करता जखमी अवस्थेत तेथेच सोडून पळून गेला. त्यात पारस हरिहर सिंग याचा मृत्यू झाला असल्याची घटना घडली होती. याबाबत खालापूर तालुक्यातील खोपोली पोलिस ठाण्यात २२४/२२५ नुसार खुनाचा गुन्हा सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास दाखल करण्यात आला होता.

# संपादकीय



## बिहार जिंकण्यासाठी 'त्रिसूत्री'!

भारतात सर्वांत दाट वस्तीच्या व सगळ्यांत गरीब लोकवस्ती असलेल्या कृषिप्रधान बिहारची विधानसभा रणधुमाळी रंगात आली आहे. किमान सात कोटी ४२ लाख मतदारांचा व सामाजिक-आर्थिकदृष्ट्या कमालीचा गुंतागुंतीचा गंगा पट्ट्यातील हा प्रदेश ताब्यात ठेवण्यासाठी राजकीय आरोप प्रत्यारोपांची राळ उडत आहे. प्राचीन काळी बौद्ध भिख्खूंचा निवासाचा विहार नंतर बिहार झाला व मौर्य, गुप्त राजवंशांनी येथूनही अखिल भारत वर्षावर सत्ता गाजविली, अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी या प्रदेशाला आहे.

एका गणनेनुसार बिहारची लोकसंख्या सुमारे १३ कोटी ७० लाख आहे. महाराष्ट्राच्या खालोखाल, ४० खासदार असलेल्या बिहारच्या २४३ सदस्यांच्या विधानसभेवर सत्ता मिळवण्यासाठीची लढत देशात चर्चेचा विषय आहे. शब्दशः आसेतु-हिमाचल अस्तित्व राखणाऱ्या या बिहारी मंडळींकडे 'कोण देणार' आणि 'कोणी दिले' हे पाहून नेमका कौल देण्याची अशी कोणती जादू असते, ते समजण्यासाठी या राज्यात प्रत्यक्ष फिरायला हवं.

बिहार निवडणुकीच्या तारखा 'श्रीं'च्या इच्छेनुसार येत्या आठवडाभरात जाहीर होऊ शकतात! राष्ट्रीय जनता दलाच्या नेतृत्वाखालील काँग्रेस व इतरांची महाआघाडी, भाजप, चिराग पासवान व नितीशकुमार यांचा जदयू आदींचा एनडीए यांच्यात ही दुरंगी लढत वाटली तरी यंदाच्या लढतीत तिसरा कोन आहे प्रशांत किशोर. रणनीतीकार ते राजकारणी असा प्रवास असलेले पी. के. यांनी अनेक प्रमुख नेत्यांना लक्ष्य केले आहे. पी.के जागा किती जिंकणार यापेक्षा ते उपस्थित करत असलेल्या मुद्द्यांचा तरुण आणि ११.३ टक्के शहरी मतदारांवर थेट परिणाम होऊ शकतो, याचा अंदाज दिल्लीतही भल्याभल्यांना आला आहे.

अनेक दशकांपासून विकास विरुद्ध जंगलराज या मुद्द्यांभोवती रेंगाळणारी बिहारी प्रचाराची दिशा बदलण्याचे प्रयत्न करणारे पी.के. यांनी दिलीप जयस्वाल, संजय जयस्वाल, मंगल पांडे आदी भाजप नेत्यांसह जदयूचे मंत्री अशोक चौधरी आदींनाही पिंजऱ्यात उभे केले आहे. आपल्या मागचा 'उप' कधी ना कधी हटवावा, यासाठी दिल्लीत लॉबिंग करणारे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी हे ९०च्या दशकात मागासवर्गीयांच्या हत्येसाठी चक्क आत गेले होते, असा आरोप पी. के. यांनी केला, तो गंभीर आहे. यामुळे निकालांनंतर चौधरी यांची केस खराब होण्याचा धोका आहे !

नितीशकुमार यांच्या(च) चेहऱ्यावर मैदानात उतरलेल्या 'एनडीए'साठी अन्य मुद्द्यांबरोबरच जी त्रिसूत्री आधार ठरेल, त्यात मतदार फेरपडताळणीचा (एसआयआर) मुद्दा ठळक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आयोगाने अंतिम एसआयआरचे ठळक मुद्दे सार्वजनिक केले आहेत. यावर वरवर नजर टाकली तरी शब्दांच्या पलीकडचे बरेच समजू शकते! या 'एसआयआर'नुसार आता मतदारांची संख्या ७.८९ कोटींवरून ७.४२ कोटींवर आली आहे. ३ लाख ६६ हजार ७४२ मतदारांची नावे वगळण्यात आली. सहसा सत्ताधाऱ्यांना अनुकूल ठरणाऱ्या पाटणा, मुझफ्फरपूर, नवादा या जिल्ह्यांत मतदार वाढले आहेत. मधुबनी (सर्वाधिक २.६६ लाख), पूर्णिया, सिवानसह बहुतेक सीमावर्ती जिल्ह्यातले मतदार घटले आहेत. आयोगाच्या माहितीनुसार तब्बल सहा हजार गैर-भारतीय (एका राज्यात) आढळणे हे वास्तव गंभीर असेच

बिहारच्या रणधुमाळीत दुसरे अस्त्र महाआघाडीनेच भाजपच्या हाती दिले आहे ते म्हणजे महिलांबाबतचे अनुद्गार. बिहारमधील महिलांची संख्या लोकसंख्येच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. महाआघाडीच्या एका सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिवंगत मातोश्रींबद्दल असभ्य उद्गार, नंतर त्यांचा एआय व्हिडीओ, हे सारे किळसवाणे आहे. 'आपली लढाई मोदींशी आहे, दिवंगत झालेल्या इतरांशी नव्हे,' हा 'जाणत्यांचा मंत्र' राहुल गांधी यांनी अमेरिका वारीआधी तेजस्वी यादव यांना सांगितला की नाही माहिती नाही, पण महाआघाडीकडून महिलांचा अपमान, हा मुद्दा ग्रामीण बिहारपर्यंत पाझरला तर, मोदींच्या भाषेतला हा सायलेंट व्होटर त्यांनाच आशीर्वाद देता झाला तर आश्चर्य वाटायला नको.

## कडवट...

कडवट बोलणारी
लागती गोड बोलू
पुंगी वाजाया लागे
फणा पसरुन डोलू

दडवू ठेवली गुपीते
दालनेलागती खोलू
कुणाची पारडीजड
चाणाक्ष नजरे तोलू

स्वप्न रंजन ते चालू
हिंदोळेलागले झुलू
सत्ता समोर बसता
चेहरे लागती खुलू

काट्यांचे जाऊ द्या
फुलेहीलागती सलू
सत्य उघडू पाहतेयं
आवरणे हळू सोलू

आता प्रत्येक शब्दां
सगळे लागती झेलू
दणकट वृक्षासोबती
गगनावर जातो वेलू

दिखावा आहे सारा
नका रे उगाचं भुलू
दगाफटका करणारं
भरवशाचा ना भालू

निंदकांच्यामुखातून
स्तुती सुमनेही झेलू
नुकताचं लावलेला
गगनावरी गेला वेलू

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# भारतीय महिला संघाला विश्वविजयासाठी शुभेच्छा !

भारतीय पुरुषांच्या क्रिकेट संघाने दुबईत झालेल्या आशिया चषक स्पर्धेत अजिंक्यपद मिळवले. अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानचा धुव्वा उडवत हे अजिंक्यपद मिळवले. या विजयानंतर संपूर्ण देशात दिवाळी साजरी करण्यात आली. अजिंक्यपद मिळवूनही भारतीय संघाने पाकिस्तानच्या नक्वी यांच्याकडून चषक न स्वीकारण्याच्या निर्णय घेतल्याने मोठा वादंग झाला. हा वादंग अजूनही चालू आहे.

भारताला सन्मानपूर्वक चषक प्रदान केला जाईल की नाही याकडे संपूर्ण देशाचे आणि मीडियाचे लक्ष लागले असतानाच भारतीय महिला क्रिकेटचा संघ ५० षटकांच्या म्हणजेच एकदिवसीय विश्वचषक खेळतोय आणि हा विश्वचषक भारतात होतोय हे माहीत असणाऱ्या लोकांची संख्या खूप कमी आहे आणि ते साहजिकच आहे कारण आपल्या देशात पुरुषांच्या क्रिकेट संघावर जीव ओवाळून टाकणारे जितके लोक आहेत त्याचा दहा टक्के लोक देखील महिला क्रिकेट पाहत नाही. महिला क्रिकेटला भारतात कधीच गांभीर्याने घेतले जात नाही. याला मीडियाही अपवाद नाही. मीडिया पुरुष क्रिकेटला जितकी प्रसिद्धी देतात त्याच्या दहा टक्केही प्रसिद्धी ते महिलांच्या क्रिकेटला देत नाही. महिला क्रिकेट संघाच्या सामान्यांना टीव्हीवर थेटपणे दाखवले जात नाही आता हा विश्वचषक भारतात असल्याने स्टार स्पोर्ट वाहिनीवर त्याचे थेट प्रेक्षपण चालू आहे पण सामना पाहणाऱ्यांची सख्या कमी आहे. मैदानावर देखील प्रेक्षकांची उपस्थिती कमीच असते. महिला क्रिकेट संघाला प्रयोजकही मिळत नाही असे असतानाही महिला क्रिकेटपटू मात्र आपले काम इमाने इतबारे करून देशाचा गौरव वाढवण्याचा प्रयत्न करतात. आता हेच पहा ना पुरुषांचा संघ ऑस्ट्रेलियात एकदिवसीय आणि टी २० मालिका खेळण्यासाठी जाणार आहे. या मालिकेत भारत कशी कामगिरी करतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे मात्र भारतात महिलांचा ५० षटकांचा विश्वचषक चालू आहे त्याची मात्र कोठेच चर्चा नाही. याच विश्वचषक स्पर्धेत रविवारी भारतीय महिलांनी पाकिस्तानी



महिलांचा ८८ धावांनी धुव्वा उडवला. भारतीय संघाने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा एकतर्फी पराभव करूनही महिला संघाचे कौतुक करण्यासाठी कोणी पुढे आले नाही. हेच जर पुरुषांच्या संघाने केले असते तर देशभर दिवाळी साजरी झाली असती. रस्त्यारस्त्यात लोकांनी तिरंगा हातून घेऊन विजयी यात्रा काढल्या असत्या.


टीव्ही चॅनलने खेळाडूंच्या कौतुकाच्या २४ तास बातम्या दाखवल्या असत्या. वर्तमानपत्रात भारतीय खेळाडूंच्या कौतुकाचे मथळे छापून आले असते. राष्ट्रपती, पंतप्रधानांपासून सर्वांनीच भारतीय संघाचे अभिनंदन केले असते. सोशल मीडियावर संघाच्या कौतुकाचा महापूर आला असता. सर्वांनी आपल्या मोबाईलवरील स्टेटसवर संघाचे व्हिडिओ, फोटो, मिम्स ठेवले असते. सरकारने विजयी संघाला रोख पारितोषिक घोषित केले असते मात्र हीच काम गिरी महिला संघाने केली तर त्यांच्या पदरी काय येते तर उपेक्षा. त्यांच्या या कामगिरीची दखल घ्यावी असे कोणालाही वाटले नाही कारण ही कामगिरी कोणी केली तर महिलांनी. केवळ याच सामन्यात नाही तर आतापर्यंत झालेल्या सर्वच सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवला आहे. भारतीय महिलांचा हा संघ बलवान संघ आहे. फलंदाजीत भारतीय संघातील महिला फॉर्मात आहे. कर्णधार हरमनप्रित कौर, स्मृती मानधना, हर्लिन देवल, जेमिना रॉड्रिग्ज, दीप्ती शर्मा, रिचा घोष हे सर्वच फलंदाज फॉर्मात आहे. यातील दोन किंवा तीन फलंदाज जरी चालले तरी भारत हा विश्वचषक जिंकू शकेल.

गोलंदाजीतही क्रांती गौड, दीप्ती शर्मा, स्नेह राणा, रेणुका या जबरदस्त फॉर्मात आहे. भारताचे क्षेत्ररक्षणही चांगले आहे एकूणच यावेळी भारतीय महिलांना विश्वचषक जिंकण्याची चांगली संधी आहे. भारतीय महिलांनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला तर भारत पहिल्यांदा ५० षटकांच्या विश्वचषकावर आपले नाव कोरू शकतो. भारतीय महिलांनी अद्याप कोणताही विश्वचषक जिंकलेला नाही. नाही म्हणायला दोन वर्षांपूर्वी १९ वर्षाखालील महिलांनी पहिल्यांदा विश्वचषकावर नाव कोरले होते. कोणत्याही स्तरावरील भारतीय महिला क्रिकेट संघाचे ते पहिले विश्वविजेतेपद होते. मात्र वरिष्ठ संघाला अशी कामगिरी करता आली नाही. याआधी भारताच्या वरिष्ठ महिला संघाने एकदिवसीय व टी २० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला होता मात्र दुर्दैवाने त्या वेळी भारतीय महिलांना विश्वविजयाला गवसणी घालण्यात अपयश आले होते आता मात्र हा विश्वचषक जिंकून हे अपयश पुसायची संधी या संघाला आहे. देशातील १४५ कोटी जनतेने भारताच्या या महिलांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले तर हा संघ देखील ऐतिहासिक कामगिरी करून भारताला विश्वचषक जिंकून देईल. भारतीय महिला संघाला विश्वविजयासाठी मनापासून शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# आरोग्य विभागाचा लहान बालकांच्या जीवाशी खेळ..!!

## आरोग्य व्यवस्थेचे पूर्णपणे बाजारीकरण, औषधी कंपन्यांचे साटे-लोटे..



व्यवस्था अजूनही पूर्ण विकसित झालेली नाही हे कटूसत्य आहे. आयुष्यमान योजना कितीही प्रभावीपणे राबवली जात असली किंवा कोरोना काळात भारताने स्वतःची लस तयार करून लाखो लोकांचे प्राण वाचवले असले तरीसुद्धा कायम स्वरूपी देशातील सर्वांचे आरोग्य सुरक्षित ठेवणारी सशक्त आरोग्य व्यवस्था निर्माण झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे.

आजही देशाच्या अनेक भागामध्ये सरकारी आणि खाजगी रुग्णालयात प्रचंड अंदाधुंदीचा कारभार पाहायला मिळतो. खाजगी रुग्णालयांमध्ये तर रुग्णांना मिळणारी वागणूक विचित्र स्वरूपाची असते. याठिकाणी आरोग्य व्यवस्थेचे पूर्णपणे बाजारीकरण झालेले आहे. तर सरकारी रुग्णालयांमध्ये गैरव्यवस्था, गैरकारभार भ्रष्टाचार आणि प्रचंड अनास्था धुमाकुळ घालत असते. सध्या देशातल्या जवळपास सहा ते सात राज्यांमध्ये कफ सिरपच्या सेवनामुळे लहान मुलांचे मृत्यू होण्याचे प्रकार सातत्याने होत आहेत. सरकारने या घटनांची दखल घेऊनच कफ सिरप औषधावर बंदी आणली आहे. शिवाय या औषधांचे उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवरही नोटीसा बजावलेल्या आहेत.

ज्या पद्धतीने लहान मुलांच्या जीवाशी खेळ केला गेला आहे. तो पाहिल्यानंतर औषध कंपन्यांनी बेजबाबदारपणाचा कळस गाठल्याचेच म्हणावे लागते आणि आता अनेक लहान मुलांचे जीव गेल्यानंतर सरकारला आलेली जाग हीसुद्धा तितक्याच बेमुर्वतखोरपणाचे निदर्शक ठरते. खरे तर केंद्र आणि राज्य स्तरावर अन्न, औषध प्रशासन विभाग कार्यरत असतो. अन्न असो किंवा औषध असो या दोन्ही गोष्टी प्रत्येक व्यक्तीच्या जीवन जगण्याचा अविभाज्य भाग ठरतात. म्हणजे निर्भेळ अन्नधान्य किंवा खाण्यापिण्याच्या वस्तूंचा नियमितपणे पुरवठा व्हावा ही याच विभागाची प्रमुख जबाबदारी ठरते. औषधांच्या उत्पादनाबाबत हा विभाग अधिक कार्यक्षम असणे अपेक्षित आहे. दुर्दैवाने अन्न किंवा औषधांच्याबाबतीत भेसळ किंवा सदोष वस्तूंचा सर्रास पुरवठा होताना दिसतो आणि त्याचे वेगवेगळे परिणाम सामान्य माणसाला भोगावे लागतात.

**● औषधी कंपन्यांचे साटेलोटे...**

हा प्रकार तर सरकारी स्तरावर नेहमीच पाहायला मिळतो की घटना घडून गेल्यानंतर सरकारी यंत्रणा जाग्या होतात. त्या घडूच नयेत याकरीता आवश्यक असलेली दक्षता काळजी घेतली जात नाही. आज थेट कफ सिरपसारख्या नेहमी वापरल्या जाणाऱ्या औषधावर निर्बंध आणण्याचे निर्णय घ्यावे लागतात. याचा अर्थ प्रचंड प्रमाणावर खपणाऱ्या किंवा औषधोपचारामध्ये प्रामुख्याने वापरले जाणारे कफ सिरप असेल किंवा पॅरासीटेमॉल असेल त्याच्या उत्पादन प्रक्रियेवरच कठोर लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे. औषध कंपन्यांकडून प्रत्येक बॅचच्या औषधांची अन्न औषध प्रशासनाकडून तपासणी होत नाही हीदेखील वस्तुस्थिती आहे. एकदा औषध निर्मितीचा परवाना दिल्यानंतर सगळाच आनंदीआनंद असतो. ज्या अटी नियम किंवा निकषांची औषध निर्मिती कंपन्यांनी नियमितपणे पूर्तता करायला हवी तेदेखील अनेकवेळेला होत नाही. अन्न औषध कंपन्यांच्या अधिकाऱ्यांना खुश

भारताचे उद्दीष्ट साध्य ठेवले की बाकीच्या गोष्टींची काळजी करावी लागत नाही आणि अन्न




आणि औषध व्यवस्थापनेचा हाच निष्काळजीपणा रुग्णांच्या जीवाशी खेळ करणारा ठरतो.आतादेखील सरकारने कफ सिरपच्या वापराबाबत जवळपास सहा राज्यांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे. हे सिरप निर्माण करणाऱ्या कंपन्यांबाबत काय ती कारवाई सरकार करेलच. परंतु अन्न औषध प्रशासनाच्या या अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष झाले किंवा ज्यांनी हा बेजबाबदारपणा केला त्यांच्याबाबतीतही सरकारने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. कोट्यवधीची उलाढाल करणाऱ्या कंपन्यांचे केवळ आपल्या नफ्यावर लक्ष असते. आपल्या औषधांचा अधिकाधिक खप व्हावा म्हणून त्यांच्याकडून केले जाणारे अनेक प्रकारचे प्रयत्न हे गैरप्रकारांना प्रोत्साहन देणारेही असतात. खरे तर गेल्या काही वर्षात भारतीय औषध कंपन्यांनी जागतिक बाजारपेठेतही आपले वर्चस्व निर्माण केलेले आहे. भारतीय औषधांना जगातल्या अनेक देशांमधून मागणीही येत असते अशा परिस्थितीत औषधांची विश्वासार्हता कायम ठेवण्याची जबाबदारी त्यांनी पाळली पाहिजे. एकूणच कफ सिरपबाबत घडलेली ही ताजी घटना औषध कंपन्यांच्या आणि अन्न औषध प्रशासनाच्या अत्यंत बेजबाबदारपणाचेच लक्षण ठरते.

**● संवेदनशीलताच संपुष्टात...**

अलिकडच्या काळात तर वैद्यकीय व्यवसायात ज्या बाजारुपणाचे थैमान पाहायला मिळते तेसुद्धा चिंताजनकच आहे. कारण या क्षेत्रात औषध निमिती, सरकारी यंत्रणा या दोन घटकांबरोबरच डॉक्टर्स हेसुद्धा तितकेच जबाबदार ठरतात. अनेक ठिकाणी रुग्णांच्या माथी अनावश्यक औषधे मारली जातात. डॉक्टर मंडळींकडून अशी कितीतरी औषधे आहेत की त्याची आवश्यकता नसताना रुग्णांना आणायला सांगितली जातात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे औषध कंपन्यांकडून डॉक्टरांना अनेक प्रकारची आमिषे दाखवली जातात. कट प्रॅक्टीस हा तर यातला एक भाग झाला. परंतु वर्षभरातून डॉक्टरांना गिफ्टस देत राहणे, काही मोठ्या कंपन्यांमधून डॉक्टरांच्या परदेशवाऱ्याही आयोजित केल्या जातात. याचा अर्थ ही औषधे आजारावर दिली जात नाहीत. तर त्याचा बाजार वाढवण्याचाच नियोजनबद्ध प्रयत्न चाललेला असतो. अनेक रुग्णांच्याबाबतीत अँटिबायोटिक्स औषधांच्या माऱ्यामुळे दुष्परिणाम पाहायला मिळाले आहेत. जी संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात विश्वासार्हता आणि संवेदनशीलता महत्त्वाची असते. त्यालाच हद्दपार केले जाते आहे. पैसा कमावण्याच्या अतिरेकी हव्यासाचे जे काही भयानक दुष्परिणाम आहेत. तेही वाढू लागलेले आहेत. केंद्र सरकारने राज्य सरकारला केवळ सूचना देऊन आपली जबाबदारी झटकता येणार नाही. सर्व राज्यांमधल्या औषधनिर्मितीसंबंधात अधिक काळजी घेण्यांसदर्भात आपली कार्यपद्धती कठोर करावी लागेल. ज्यासाठी अन्न आणि औषध प्रशासन विभाग निर्माण केला आहे. तिथे असणारे दोष संपवावे लागतील. विशेषतः वाढता भ्रष्टाचार संपुष्टात आणावा लागेल तरच रुग्णांच्या जीवाशी केला जाणारा हा खेळ थांबू शकेल.

## बनवा उपवासाचे हेल्दी-टेस्टी वरईचे आप्पे

नवरात्रीनिमित्त नऊ दिवस उपवास असल्याने रोज काय बनवयाचे, असा प्रश्न अनेकांना पडतो. त्यात रोज साबुदाणा खिचडी, राजगिऱ्याचा लाडू, रताळे, बटाट्याचे वेफर्स, भगरीची भाकरी, असे तेच तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. त्यामुळे आम्ही तुम्हाला उपवासाचे अप्पे कसे बनवायचे हे सांगणार आहोत. जे तुम्ही नवरात्रीत उपवास असेल, तर नक्की आजमावून पाहा.



**वरईचे आप्पे साहित्य :**

- १ कप वरई
- पाव कप साबुदाणा
- ३ कप दही
- जिरे
- मीठ
- हिरव्या मिरचाच ठेचा

**वरईचे आप्पे कृती :**

- सर्वप्रथम साबुदाणा मिक्सरला दळून घ्यायचा. दळून झाल्यानंतर त्यामध्ये वरई घालून पुन्हा मिक्सरला एकदा फिरवून घ्यावे.
- मग साबुदाणा आणि वरई मिश्रण एका बाउलमध्ये काढून घ्यावे. त्यानंतर त्यामध्ये दही व्यवस्थित मिक्स करून घ्यायचे.
- मग त्यामध्ये एक चमचा जिरे, हिरव्या मिरचीचा ठेचा, चवीनुसार मीठ घालायचे. त्यानंतर मिश्रणात थोडं पाणी घालून ते व्यवस्थित मिक्स करायचं.
- अशा प्रकारे तुम्ही उपवासाच्या आप्प्यांचे पीठ तयार करा. **(टिप – पीठ जास्त पातळं आणि जास्त घट्ट नको)** आप्प्यांचं पीठ तयार झाल्यानंतर ते १५ , २० मिनिटं झाकून बाजूला ठेवून द्यायचे.
- त्यानंतर आप्पे पात्र गरम करून त्यामध्ये तेल सोडा आणि जे बॅटर तयार करून घेतलं आहेत ते आप्पे पात्रात घाला.
- मग झाकणं ठेवून ते २ ते ३ मिनिटे शिजवून घ्यायचे आणि पुन्हा त्यात तेल सोडून दोन्ही बाजूने नीट भाजून घ्यायचे.
- अशा प्रकारे तुमचे उपवासाचे आप्पे तयार सर्वांना सर्व्ह करा.

# देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर हल्याचा प्रयत्न हि धोक्याची घंटा !

सर्वोच्च न्यायालयात एका महत्वाच्या सुनावणी दरम्यान भारताचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर एका वकिलाने बुट फेकून कोर्टातच हल्याचा प्रयत्न केल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाल्याचे अधोरेखित झाले आहे एका सर्वोच्च मानाच्या पदावरील सरन्यायाधीशांचा बुट फेकून त्यांना अपमानित करण्यात येतं असेल तर सर्वसामान्यांचे काय? असले हल्ले नवीन नाहीत अनेक वेळा शाई फेकणे, अधिकाऱ्यांवर धावून जाणे संसदेत, विधानसभेत आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडून वादंग, हल्ले झाल्याच्या घटना आपण पाहिल्या आहेत पण हे सर्व वेगळ्या दिशेने जाते आहे. न्यायाच्या हक्कासाठी झगडणाऱ्या वकिलाची हल्ला करण्याची हिम्मत कशी झाली यामागे कुठली आदृष्य शक्ती आहे का ? हा देखील प्रश्न उपस्थित होतो आहे न्यायदेवतेच्या मंदिरातच असल्या घटना घडू लागल्या तर विश्वास कोणावर ठेवायचा मध्य प्रदेशातील खजुराहो येथे भगवान विष्णूंच्या ७ फूट उंच शिरच्छेदित पुतळ्याच्या जीर्णोद्धारांवर गवई यांच्या टिप्पण्यांमुळे वकिल नाराज आहेत त्यातूनच हा हल्ला झाल्याचे बोलले जात आहे. मात्र कितीही वकील नाराज असले तरी असला लज्जास्पद आणि घृणास्पद प्रकार खपवून घेतला नसला पाहिजे लोकशाही आणि संविधानाच्या मूल्यांना आधार मानून वाद प्रतिवादातून न्याय भूमिकेकडे जाण्यासाठी न्यायव्यवस्था असते आणि तेथेच सरन्यायाधीशांवर आशा प्रकारे हल्ला होणे हा केवळ न्यायव्यवस्थेचाच नव्हे तर लोकशाहीचा, संविधानाचा आणि पर्यायाने देशाचा घोर अवमान आहे. याचा गांभीर्याने विचार करणे अपेक्षित आहे.

**- राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

## राष्ट्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेसाठी सुभाष पाटील यांची स्पर्धा प्रमुख व तेजस माळी पंच म्हणून निवड

**दि.०६, मुंबई :** पोलीस हेडक्वॉटर जम्मू आणि काश्मिर,श्रीनगर,खेल मंत्रालय भारत सरकार व तायकवांडो फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित पोलीस गेम्स राष्ट्रीय तायक्वॉदो स्पर्धा पोलो मैदान श्रीनगर जम्मू - काश्मिर येथे १० ते १४ ऑक्टोबर २०२५ रोजी होणाऱ्या स्पर्धेसाठी रायगडचे सुपुत्र तायकवोंडोचे आंतरराष्ट्रीय पंच व ७ वी डिग्री ब्लॅक बेल्ट यांची तायकवोंडो खेळात निस्वार्थी पोलीस गेम्स तायकवोंडो राष्ट्रीय स्पर्धेसाठी स्पर्धा प्रमुख म्हणुन निवड झाली आहे. तसेच या स्पर्धेसाठी पंच म्हणुन तेजस माळी (१२ वेळा राष्ट्रीय सुवर्णपदक विजेता) याची निवड झाली आहे.

तसेच रायगडचे सुपुत्र सुभाष पाटील यांची तायक्वांदो खेळात निस्वार्थीपणे पंच प्रशिक्षक म्हणुन देशात व परदेशात आतापर्यंत करत असलेल्या कामगीरीची दखल घेत व त्यांच्या अनुभवाचा फायदा पोलीस खेळाडू, प्रशिक्षक व पंच यांना व्हावा व भविष्यात देशातुन उत्कृष्ट पंच प्रशिक्षक व खेळाडू तयार होतील म्हणून देशातील या खेळाची अधीकृत शिखर संघटना तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांनी सुभाष पाटील यांची श्रीनगर येथे होणाऱ्या राष्ट्रीय पोलीस गेम्स तायकवोंडो स्पर्धा प्रमुख पदी नेमणुक केली आहे.तसेच खेळाडु म्हणुन नवी मुंबई पोलीस मयुरी खरात हिची निवड झाली आहे.मयुरी खरात गेली १५ ते १७ वर्ष तायक्वॉदो खेळाचे प्रक्षिक्षण सुभाष पाटील यांच्याकडे घेत आहे.

This letter was written by owner, printer, publisher - Vinod Kailas Gore by Siddhakala Print Media And Publications Pvt. Ltd. at Main Road, At. Plot No. W-230, T.T.C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai, Dist- Thane, Pin Code- 400710, Maharashtra and Published at C/o. Prashant Arun Chavan, House No. 926/3, Flat No. 301, Sector 1A, Nerul, Navi Mumbai, Thane Maharashtra – 400 706 Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Thane Court.
Email : newsaksharaj2021@gmail.com Editor : Prashant Arun Chavan (Editorial responsibility will remain with PRB as per law.) Mob : 8605313202
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक विनोद कैलास गोरे - यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रा.लि.,प्लॉट नं. डब्लू- २३०, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरीया, खैरणे एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई, जि. ठाणे, पिन कोड - ४०० ७१०, महाराष्ट्र येथे मुद्रित करून, प्रशांत अरुण चव्हाण, हाऊस नं.९२६/३, फ्लॅट ३०१, सेक्टर १अ, नेरुळ, नवी मुंबई, जि.ठाणे, महाराष्ट्र - ४०० ७०६ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद ठाणे न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail. com संपादक : प्रशांत अरुण चव्हाण (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबावदारी यांच्याकडे राहील.) मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

## विंचूरमध्ये प्राणघातक हल्ल्याने संताप

### अश्या घटनेची पुनरावृत्ती झाल्यास सडीतोड उत्तर दिले जाईल- विंचूर ग्रामस्थ



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०६ विंचूर (नाशिक) :** विंचूर शहरात घडलेल्या प्राणघातक हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. दि. ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसहा वाजता मारवाडी पेठेत व्यापारी पवनकुमार जाजु यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. ही घटना शहराच्या मध्यवर्ती भागात घडल्याने नागरिक, व्यापारी वर्ग आणि सर्वसामान्यांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे.

या हल्ल्याच्या निषेधार्थ सोमवार, दि.६ ऑक्टोबर रोजी विंचूर शहरात अत्यावश्यक सेवा वगळता कडकडीत बंद पाळण्यात आला. सकाळी साडेदहा वाजता ग्रामस्थ, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सर्वपक्षीय मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांना निषेधाचे निवेदन सादर केले.




निवेदनाद्वारे नागरिकांनी या प्रकरणातील सर्व आरोपींवर तात्काळ आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, शहरात गुन्हेगारी घटनांना आळा बसावा यासाठी पोलीस प्रशासनाने सतर्कता आणि गस्त वाढवावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**दरम्यान, नागरिकांनी स्पष्टपणे इशारा दिला आहे की, विंचूरमध्ये अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडल्यास त्या कुठल्याही परिस्थितीत सहन केल्या जाणार नाहीत. नागरिक स्वतः न्याय मागण्यासाठी उभे राहतील. गुन्हेगारांना चोख प्रतिउत्तर दिले जाईल. विंचूर शहर शांत आहे, पण घाबरलेले नाही. अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहील!**

व्यापारी असोसिएशन, सामाजिक संघटना आणि ग्रामस्थांनी दिलेल्या या संतप्त प्रतिक्रियांमुळे प्रशासनासमोर गुन्हेगारांविरुद्ध तात्काळ कारवाईचा दबाव निर्माण झाला आहे. शहरात दिवसभर शांततेत बंद पाळला गेला असला तरी वातावरणात तीव्र असंतोष आणि निषेधाचे सूर घुमत होते.

## सैर करणं पडलं महागात, सिंधुदुर्ग-शिरोडा वेळागर समुद्रात ८ पर्यटक बुडाले



**दि.०६, सिंधुदुर्ग :** सिंधुदुर्गमधून एक मोठी आणि धक्कादायक बातमी समोर आली आहे. सिंधुदुर्ग येथील शिरोडा वेळागर समुद्रात आठ पर्यटक बुडाले आहेत. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार तीन जणांचे मृतदेह सापडले असून, अन्य तीन जणांना वाचवण्यात आलं आहे, तर अन्य दोघांचा शोध सुरु आहे. प्राप्त माहितीनुसार, हे सर्व पर्यटक सिंधुदुर्ग येथील रहिवासी असल्याचं सांगण्यात येत आहे. पर्यटकांची बुडाल्याची बातमी ऐकताच कुटुंबीयांनी समुद्रकिनारीच टाहो फोडला. दरम्यान, हे पर्यटक सुमद्राची सैर करण्यासाठी गेले असल्याची देखील माहिती सांगण्यात येत आहे. बातमी ऐकताच कुटुंबीयांनी समुद्राच्या किनाऱ्यावरच आक्रोश केला.

**समुद्रातून बाहेर काढलेल्या पर्यटक !**

१. इसरा इम्रान कित्तूर (वय १७, रा. लोंढा, बेळगाव) (वाचला आहे)
२. फरहान इरफान कित्तूर (वय ३४, रा. लोंढा, बेळगाव) (मयत)
३. इबाद इरफान कित्तूर (वय १३, रा. लोंढा, बेळगाव) (मयत)
४. नमीरा आफताब अख्तर (वय १६, रा. अल्लावर, बेळगाव) (मयत)

**बेपत्ता पर्यटक !**

१. इरफान मोहम्मद इसाक कित्तूर (वय ३६, रा. लोंढा, बेळगाव)
२. इक्वान इमरान कित्तूर (वय १५ रा. लोंढा, बेळगाव)
३. फरहान मोहम्मद मणियार (वय २०, रा. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग)
४. जाकीर निसार मणियार (वय १३, रा. कुडाळ जि. सिंधुदुर्ग)

## संध्याकाळनंतर गावात रडण्यास बंदी, कोकणातील हे गाव कोणतं?

**दि.०६, सिंधुदुर्ग :** महाराष्ट्रातील प्रत्येक गावा-गावांत विविध प्रथा, परंपरा असतात. पण सर्वसाधारणपणे राज्यभरातील जवळपास प्रत्येक घरात एक नियम सारखाच असतो, तो म्हणजे संध्याकाळी घराघरात दिवे लावले जातात. तसंच संध्याकाळच्या वेळी काही घरांमध्ये काही गोष्टींचं काटेकोर पालन केलं जातं. महाराष्ट्रात असंच एक गाव जे एका संध्याकाळच्या एका खास प्रथेसाठी ओळखलं जातं. गावातील लोकांना संध्याकाळ झाल्यानंतर रडण्यास मनाई आहे. म्हणजेच संध्याकाळी दिवेलागणीपासून नंतर संपूर्ण रात्रभर, सकाळी होईपर्यंत गावातील कोणीही रडू शकत नाही. हे वाचून विचित्र वाटत असलं, तर राज्यातील या गावात ही प्रथा काटेकोरपणे पाळली जाते.

**कोकणातील गावात संध्याकाळपासून रडण्यास बंदी**

संध्याकाळी रडण्यास बंदी असलेलं हे गाव आहे कोकणातील सिंधुदुर्गातील श्रावणगाव. या गावात अनोखी परंपरा आहे. संध्याकाळी न रडण्यामागे एक खास गोष्ट आहे. या गावाची ग्रामदेवता हिंसाचाराविरोधात आहे. त्यामुळेच या गावात भाडणं करणं मान्य नाही. तसंच गावातील लोक पूर्णपणे शाहाकारी आहेत. शिवाय संध्याकाळपासून कोणीही गावात रडलं, तर ग्रामदेवता क्रोधीत होऊन शाप देते असं मानलं जातं. गावातील एखाद्या घरात भांडणाचा, रडण्याचा आवाज आला, तर त्या घरातील सदस्यांना ज्येष्ठ लोकांसमोर भांडणाचं, रडण्याचं कारण, स्पष्टीकरण द्यावं लागतं.

**गावाने आजही जपली आहे जुनी परंपरा**

आज टेक्नोलॉजीच्या काळातही कोकणातलं हे गाव त्यांची जुनी परंपरा जपून आहेत. त्यांनी जपलेल्या परंपरेमुळेच त्यांच्या गावावर येणारी कोणतीही संकटं किंवा आपत्ती टाळली जात असल्याची त्यांची श्रद्धा आहे. या परंपरेमुळे राज्यभरात या गावाची खास ओळख आहे.


"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"
Email-forestrange@28gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वनपरिक्षेत्र अधिकारी नागोठणे यांचे कार्यालय
मु.पो. नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड ४०२१०६

### जाहिर निविदा सुचना

मा. उप वनसंरक्षक अलिबाग वनविभाग अंतर्गत नागोठणे (प्रादेशिक) वनपरिक्षेत्रातील विविध योजने अंतर्गत प्रशासकीय मंजुरीचे अधीन राहून विविध प्रकारची सिमेंट बंधारा, चेनलिंक फेन्सींग, पेवर ब्लॉक व रस्ता, कंपाउंड वॉल इत्यादी कामे करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, जिल्हा परिषद व जल संपदा विभाग या विभागाकडे वर्ग १ ते ७ वर्गातील पंजीकृत कंत्राटदाराकडून खालील नमुद अटी व शर्ती चे अधिन राहून दिलेल्या प्रपत्रात सिलबंद लिफाफामध्ये निवीदा मागविण्यात येत आहे. संबंधीत कामाबाबतची निवीदा फॉर्म व अटी शर्ती प्रति कामनिहाय रु. १००/- रोखीने भरणा केल्यास दुपारी १२.०० ते ३.०० वाजपर्यंत परिक्षेत्र वन अधिकारी, नागोठणे (प्रादेशिक), ता. रोहा, जि. रायगड येथे उपलब्ध होईल.

| | |
|---|---|
| निवीदा प्रकाशित करावयाची तारीख | ०७/१०/२०२५. पूर्वी |
| निवीदा फॉर्म व अटी शर्ती मिळण्याची तारीख व वेळ | ०७/१०/२०२५ ते १५/१०/२०२५ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत |
| निवीदा भरण्याची अंतीम तारीख | १५/१०/२०२५ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत |
| निवीदा उघडण्याची तारीख | २७/१०/२०२५ (सोईनुसार) ठिकाण :- मा. सहाय्यक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा) अलिबाग यांचे कार्यालय |

**कामाचा तपशिल खालीलप्रमाणे-**

| अ.क्र. | तपशिल | परिमाण | अंदाजपत्रक रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मौजे राबगाव स.नं. १ / अ | Providing and erecting chainlink fencing with UCR wall for Type I Qtr at S.No. 1/A | ८०१००४ | |
| २. | मौजे नागोठणे स.नं. ११५ | Providing and erecting chainlink fencing with UCR wall for Type III Qtr | ८०१००४ | |
| ३. | मौजे पळस सं.नं.६३ | Providing and fixing paver block at Beat Guard Vasgaon East Type I Quarter | ४१२४३२ | |
| ४. | मौजे पळस सं.नं.६३ | Providing and fixing paver block at Beat Guard Kondgaon Type I Quarter | ४१२७७२ | |
| ५. | मौजे पळस सं.नं.६३ | Providing and fixing paver block at Beat Guard Koleti Type I Quarter | ४१२३५२ | |
| ६. | मौजे पळस सं.नं.६३ | Construction of Road for Quarters | ८२६३८१ | |
| ७. | मौजे नागोठणे स.नं. ११५ | Providing and fixing paver block RFO Quarter | ७८०९९६ | |
| ८. | मौजे नागोठणे स.नं. ११५ | Construction of RCC Strom water drainage for RFO Quarter | ८१७९६५ | |
| ९. | मौजे नागोठणे स.नं. ११४ | Construction of Compound wall (Brick & UCR) | ७९७०२७ | |
| १०. | मौजे नागोठणे स. नं. ११५ | Construction of Compound wall (Brick & UCR) | ७९७०२७ | |
| ११. | मौजे नागोठणे स.नं. १२८ | Construction of Compound wall (Brick & UCR) | ७९७०२७ | |
| १२. | मौजे नागोठणे स.नं. १२९ | Construction of Compound wall (Brick & UCR) | ७९७०२७ | |
| १३. | मौजे नागोठणे स.नं. १२८ & १३० | Construction of Compound wall (Brick & UCR) | ७९७०२७ | |
| १४. | मौजे नागोठणे स.नं. ११५ | Construction of Compound wall (Brick & UCR) | ५८५६७४ | |
| १५. | मौजे नागोठणे स.नं. ११५ | Construction of Compound wall (Brick & UCR) | ७९७०२७ | |
| १६. | मौजे नागोठणे स.नं. ११५ | Construction of Compound wall (Brick & UCR) | ७९७०२७ | |
| १७. | मौजे पळस स.नं.६३ | Construction of Chainlink Fencing | ८२८२३८ | |
| १८. | मौजे वासगाव पूर्व कं. नं. ४०९ | Construction of Cement Bandhara | ८०१८३५ | |
| १९. | मौजे वासगाव पूर्व कं. नं. ४०५ | Construction of Cement Bandhara | ८०१८३५ | |
| २०. | मौजे चिखलगाव कं. नं. ३९९ | Construction of Cement Bandhara | ८०१८३५ | |
| २१. | मौजे नागोठणे कं. नं. ३९१ | Construction of Cement Bandhara | ८०१८३५ | |
| २२. | मौजे पाटणसई कं. नं.३९४ | Construction of Cement Bandhara | ८०१८३५ | |
| २३. | मौजे कोलेटी कं. नं. ४१५ | Construction of Cement Bandhara | ७६८२९८ | |
| २४. | मौजे कोंडगाव पश्चिम कं.नं.४१०, ४११ | Construction of Cement Bandhara | ७६८२९८ | |
| २५. | मौजे राबगाव कं. नं. ३९६ | Construction of Cement Bandhara | ७६८२९८ | |
| २६. | मौजे राबगाव कं. नं. ३९६ | Construction of Cement Bandhara | ७६८२९८ | |
| २७. | मौजे राबगाव कं. नं. ३९७ | Construction of Cement Bandhara No.1 | ७७८२४९ | |
| २८. | मौजे राबगाव कं.नं. ३९७ | Construction of Cement Bandhara No.2 | ७७८२४९ | |
| २९. | मौजे राबगाव कं.नं. ३९७ | Construction of Cement Bandhara No.3 | ७७८२४९ | |
| ३०. | मौजे जांभूळमाळ कं. नं. ३९६ | Construction of Cement Bandhara No.1 | ७७८२४९ | |
| ३१. | मौजे जांभूळमाळ कं. नं. ३९६ | Construction of Cement Bandhara No.2 | ७७८२४९ | |
| ३२. | मौजे जांभूळमाळ कं.नं. ३९६ | Construction of Cement Bandhara No.3 | ७७८२४९ | |
| ३३. | मौजे चिखलगाव कं.नं. ३९९ | Construction of Cement Bandhara No.3 | ७७८२४९ | |
| ३४. | मौजे चिखलगाव कं.नं. ३९९ | Construction of Cement Bandhara No.4 | ७७८२४९ | |
| ३५. | मौजे चिखलगाव कं.नं. ३९९ | Construction of Cement Bandhara No.2 | ७७८२४९ | |
| ३६. | मौजे करंजाई कं. नं. ४०० | Construction of Cement Bandhara No.1 | ७७८२४९ | |
| ३७. | मौजे करंजाई कं. नं. ४०० | Construction of Cement Bandhara No.2 | ७७८२४९ | |
| ३८. | मौजे करंजाई कं. नं. ४०० | Construction of Cement Bandhara No.3 | ७७८२४९ | |
| ३९. | मौजे बलाप कं. नं. ३९८ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ४७६६३९ | |
| ४०. | मौजे बलाप स.नं.४/अ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ६८५६१० | |
| ४१. | मौजे राबगाव कं.नं. ३९७ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I बसविणे | ७८६५२० | |
| ४२. | मौजे वरवठणे ग.नं. १५८, ४४४, ४४१ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ७८७०९४ | |
| ४३. | मौजे वणी कं. नं. २१६ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I बसविणे | ७८६५२० | |
| ४४. | मौजे वरवठणे कं. नं. २१८ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I बसविणे | ७६३०४२ | |
| ४५. | मौजे मिरानगर सं.नं. २०७ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ६३३९८९ | |
| ४६. | मौजे पाटणसई कं. नं. ३९३ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ६१५२५२ | |
| ४७. | मौजे वझरोली कं. नं. ३९४ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ५८८४४७ | |
| ४८. | मौजे वासगाव कं. नं. ४०४ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ५२३६७२ | |
| ४९. | मौजे वासगाव कं. नं. ४०६ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ६१५२५२ | |
| ५०. | मौजे वासगाव पू कं. नं. ४०९ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ३९६३१७ | |
| ५१. | मौजे वरप सं.नं. ३६अ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I बसविणे | ७८६५२० | |
| ५२. | मौजे आमडोशी स.नं. ३२४ व मौजे वेलशेत स.नं. ६५ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ४४९९१० | |
| ५३. | मौजे वणी स.नं. १६७ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ५७०५५१ | |
| ५४. | मौजे वणी कं. नं. २१५ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ४१००२८ | |
| ५५. | मौजे वणी कं. नं. २१६ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- II बसविणे | ६२४८१३ | |
| ५६. | मौजे चेराठी कं. नं. २१७ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ७८६२५४ | |
| ५७. | मौजे कुहिरे स.नं.६७ व मौजे बेणसे स.नं. ६५ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | ५८३२८५ | |
| ५८. | मौजे पाटणसई कं. नं. ३९५ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I व II बसविणे | १२१६३६ | |
| ५९. | मौजे वरप स.नं. ३६ब | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- I बसविणे | २२३०४३ | |
| ६०. | मौजे वरवठणे कं. नं. २१८ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- II बसविणे | २७६२३३ | |
| ६१. | मौजे राबगाव कं. नं. ३९७ | सिमेंट काँक्रीट पिलर्स वर्ग- II बसविणे | १८४१५५ | |
| ६२. | मौजे पळस स.नं. ६३ | वनरक्षक कोंडगाव उत्तर यांचे निवासस्थाना सभोवती चेनलिंक फेन्सींग तयार करणे | ८२८४८८ | |
| ६३. | मौजे पळस स.नं. ६३ | वनरक्षक कोलेटी यांचे निवासस्थाना सभोवती चेनलिंक फेन्सींग तयार करणे | ८२८४९८ | |

तरी इच्छुक कंत्राटदार यांनी निवीदा कालावधी वनपरिक्षेत्र कार्यालय नागोठणे येथे निवीदा सादर कराव्यात. अधिक माहितीसाठी वनपरिक्षेत्र कार्यालय नागोठणे यांचे कार्यालयाशी सुट्टीच्या दिवसाखेरीज कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

**ठिकाण :- नागोठणे**
**दिनांक :-**

**सही**
**(डि.एस. कुकडे)**
**वन परिक्षेत्र अधिकारी, नागोठणे (संरक्षण)**


## अभिजात मराठी भाषा संवर्धन सप्ताह अंतर्गत प्रदर्शनाचे आयोजन



**अक्षराज : संग्राम ठाकूर**

**दि.०६, पनवेल :** अभिजात मराठी भाषा दिवस व अभिजात मराठी भाषा सप्ताह राज्यात दिनांक ०३ ऑक्टोबर ते ०९ ऑक्टोबर या दरम्यान साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या वतीने मराठी भाषेविषयी माहितीपर प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त अभिषेक पराडकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर, सामान्य प्रशासन विभागप्रमुख किर्ती महाजन यांच्या उपस्थितीत या प्रदर्शनाची सुरूवात महापालिका मुख्यालयात करण्यात आली.पालिकेच्या वतीने अभिजात मराठी भाषा संवर्धन सप्ताह अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन महापालिका क्षेत्रात करण्यात आले आहे.

या अंतर्गत आज मराठी भाषेविषयी माहितीपर प्रदर्शनाचे आयोजन आज महापालिका मुख्यालयात , केएलई महाविद्यालय कळंबोली व दगडी शाळा येथे करण्यात आले. या बरोबरच विविध शाळा व महाविद्यालयांमध्येही हे प्रदर्शन राबविले जाणार आहे.

**'अभिजात मराठी भाषा' निबंध स्पर्धा**

अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत महापालिका मनपा हद्दीतील सर्व नागरिकांसाठी 'अभिजात मराठी भाषा' या विषयाची निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेकरिता स्वलिखित हस्ताक्षरामध्ये स्पर्धकांनी ७ ऑक्टोबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत आपले निबंध पालिकेच्या लोकनेते दि.बा. पाटील शाळेचे मुख्याध्यापक वाल्मिक राठोड यांच्याकडे सुपूर्त करावे असे आवाहन पालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. याच बरोबर 'मराठी भाषाचे सौंदर्य आणि नवी दिशा' या विषयावरती प्रा.डॉ.वि.ल.धारूरकर, छत्रपती संभाजीनगर यांच्या व्याख्यानाचे आयोजन दिनांक ९ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. तसेच विविध शाळांमध्ये प्रश्नमंजूषा, व्याख्यान, प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत पालिकेच्या वतीने रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स, खारघर महाविद्यालयामध्ये व्याख्यान व प्रश्नमंजूषा, निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे मराठी प्राध्यापक मानसी कोष्टी, दुर्गा मौर्य यांचे सहकार्य लाभले.

**दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन**

अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत दिनांक ९ ऑक्टोबर रोजी दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयामध्ये करण्यात येणार आहे. पनवेल महापालिका व के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी १२ ते ६ यावेळेत होणाऱ्या या प्रदर्शनास महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी असे आवाहन पालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## ठाणे आणि मुंबईकरांसाठी महत्वाची बातमी!

### ७ ते १० ऑक्टोबर १० टक्के पाणी कपात



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०६, ठाणे :** मुंबई आणि ठाण्यातील नागरिकांना पुढील तीन दिवस पाणीपुरवठा कमी प्रमाणात मिळणार आहे. ठाणे महापालिकेच्या पिसे आणि पांजरापूर येथील जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये वीज मीटर्स अद्यावतीकरणाचे काम हाती घेण्यात आल्याने ७ ऑक्टोबर (मंगळवार) ते ९ ऑक्टोबर (गुरुवार) या काळात १० टक्के पाणी कपात लागू होणार आहे. या काळात ठाणे आणि मुंबईतील काही भागांमध्ये पाण्याचा पुरवठा मर्यादित प्रमाणात होईल.

**काय काम सुरू आहे?**

महापालिकेकडून १०० किलोवॅट वीज मीटर्स अद्ययावत करण्याचे काम पिसे आणि पांजरापूर या जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये केले जात आहे. हे काम दुपारी १२:३० ते ३ या वेळेत पार पडणार असून या दरम्यान काही भागांमध्ये तात्पुरता पाणीपुरवठा बंद राहू शकतो. काम पूर्ण झाल्यानंतर १० ऑक्टोबरपासून पाणीपुरवठा पुन्हा सुरळीत सुरू होईल, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

**ठाण्यात कोणत्या भागांवर परिणाम?**

ठाणे महापालिकेला दररोज ८५ एमएलडी पाणी मुंबई महापालिकेच्या स्रोतांतून मिळते. याच पुरवठ्यावर आधारित नौपाडा, पाचपखाडी, हाजुरी, लुईसवाडी, रघुनाथ नगर, नामदेव वाडी, साईनाथ नगर, रामचंद्र नगर, किसन नगर नं. १ व २, शिवाजी नगर, पडवळ नगर, जनता झोपडपट्टी, शिवशक्ती नगर, करवालो नगर, अंबिका नगर, ज्ञानेश्वर नगर, जय भवानी नगर, काजुवाडी, जिजामाता नगर, बाळकुम पाडा नं. १, लक्ष्मी नगर, आंबेडकर नगर, मानपाडा (नळपाडा), कोपरी धोबीघाट, गावदेवी (लुईसवाडी) जलकुंभ, टेकडी बंगला जलकुंभ, भटवाडी, इंदिरानगर, आनंद नगर, गांधी नगर, कोपरी कन्हैया नगर या भागांमध्ये पाणी कपात लागू होणार आहे.

**मुंबईतील कोणते भाग प्रभावित होतील?**

दक्षिण मुंबई आणि उपनगरांतील काही भागांमध्ये सुद्धा या काळात पाण्याचा पुरवठा कमी होईल. फोर्ट, कोलाबा, मरीन ड्राईव्ह, नरीमन पॉइंट, मस्जिद बंदर, मोहम्मद अली रोड, डोंगरी, भेंडी बाजार, भायखळा, आग्रीपाडा, नागपाडा, परळ, लालबाग, हिंदमाता, लोअर परळ, माटुंगा आणि सायन या भागांमध्ये पाणीपुरवठ्याचा खोळंबा अपेक्षित आहे.

महापालिकेने नागरिकांना या काळात पाण्याचा आवश्यक साठा करून ठेवण्याचे आणि पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन केले आहे. पाणीपुरवठा सुधारणा कामकाज पूर्ण झाल्यानंतर १० ऑक्टोबरपासून नियमित पाणीपुरवठा सुरू होईल, असेही महापालिकेने आश्वासन दिले आहे.

## मद्यधुंद कारचालकाने दुचाकीस्वाराला फरफटत नेले

**दि.०६, पुणे :** पुण्यात पुन्हा एकदा हिट अँड रन प्रकरण घडलं आहे. मद्यधुंद कारचालकाने एका दुचाकीला धडक देत फरफटत नेल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेत दुचाकी चालक थोडक्यात बचावला आहे. अन्यथा मोठा अनर्थ घडला असता. पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिराजवळील विठ्ठल रामजी शिंदे पुलाजवळ शनिवारी सायंकाळी एका मद्यधुंद वॅगनर चालकाने भरधाव गाडी चालवत दुचाकीस्वाराला धडक देत फरफटत नेले. या अपघातात अन्य दोघांनाही धडक बसली. कार दुभाजकाला आदळल्याने तिचा चेंदामेंदा झाला. पोलिसांनी संबंधित चालकाविरुद्ध ड्रंक ॲण्ड ड्राईव्हचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी अनिकेत रमाकांत सोनटक्के याला ताब्यात घेतलं आहे. तो २५ वर्षांचा आहे. तो सध्या चाकणचा रहिवासी असून मूळचा धाराशिवचा आहे.रंगमंदिर परिसरात खत्री वडेवाले यांच्या समोरून एक वॅगनर कार वेगात आली आणि विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीस्वाराला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दुचाकीस्वार रस्त्याच्या बाजूला फेकला गेला, मात्र कारचालकाने दुचाकीला फरफटत नेत ओंकारेश्वर मंदिरापर्यंत गाडी चालवत नेली. सुदैवाने दुचाकीस्वार वेळेत बाजूला पडल्याने गंभीर अपघात टळला.

# राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत जाहीर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, मुंबई :** राज्यातील २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगर पंचायतींच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत पार पडली.

यावेळी नगर विकास विभागांचे अपर मुख्य सचिव डॉ. के.एच. गोविंदराज, उपसचिव प्रियांका कुलकर्णी, छापवाले, उपसचिव विद्या हम्पय्या, अनिरुद्ध जेवळीकर, यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यातील २४७ नगरपरिषदेपैकी ३३ पदे अनुसूचित जातींसाठी व ११ पदे अनुसूचित जमातीसाठी आणि ६७ पदे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित झाली आहेत. तर १३६ पदे खुल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहेत.

**नगरपरिषद आरक्षण पुढील प्रमाणे :-**

नगर परिषदांमधील अनुसूचित जातीसाठी आरक्षित पदे (एकूण ३३ पदे)

अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित नगरपरिषद (१७ पदे) –

१. देऊळगाव राजा, २. मोहोळ, ३. तेल्हारा, ४. ओझर, ५. वाना डोंगरी (नागपूर), ६. भुसावळ, ७. घुग्घुस, ८. चिमूर, ९. शिर्डी, १०. सावदा, ११. मैंदर्गी, १२. डिगडोह(देवी), १३. दिग्रस (यवतमाळ), १४. अकलूज, १५. परतूर, १६. बीड, १७. शिरोळ

**अनुसूचित जाती प्रवर्गासाठी (सर्वसाधारण) आरक्षित नगरपरिषद (१६ पदे)**

१. पांचगणी, २. हुपरी, ३. कळमेश्वर, ४. फुरसुंगी ऊरुळी-देवाची, ५. शेगांव, ६. लोणावळा, ७. बुटीबोरी, ८. आरमोरी, ९. मलकापूर जि.सातारा, १०. नागभिड, ११. चांदवड, १२. अंजनगांवसूर्जी, १३. आर्णी, १४. सेलू, १५. गडहिंग्लज, १६. जळगांव-जामोद,

**अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी आरक्षित नगर परिषदा :-**

अनुसुचित जमातीसाठी एकूण ११ पदांपैकी ६ पदे महिलांसाठी आरक्षित आहेत.

अनुसुचित जमाती महिलांसाठी आरक्षित (६ पदे)

१. पिंपळनेर, २. शेंदूरजनाघाट, ३. भडगांव, ४. यवतमाळ, ५. उमरी, ६. वणी

**अनुसुचित जमाती सर्वसाधारण प्रवर्ग (५ पदे)**

१. पिंपळगांव-बसवंत, २. राहुरी, ३. एरंडोल, ४. अमळनेर, ५. वरुड

**नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी नगर परिषदा :-**

एकूण २४७ नगरपरिषदांमधून ६७ पदे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी आरक्षित ठेवण्यात आली आहेत.

**नागरिकांचा मागास प्रवर्गातील (सर्वसाधारण) आरक्षित पदे (३३ पदे)**

१. तिरोडा, २. वाशिम, ३. भद्रावती, ४. परांडा, ५. नंदुरबार, ६. खापा, ७. शहादा, ८. नवापूर, ९.त्र्यंबक, १०. कोपरगांव, ११. मंगरुळपीर, १२. कन्हान-पिंपरी, १३. पाथर्डी, १४. रामटेक, १५, नशिराबाद, १६.पालघर, १७. वरणगांव, १८. मलकापूर, जि.बुलडाणा, १९. इस्लामपूर, २०. मोहपा, २१. तुमसर, २२. महाड, २३. राहता, २४. श्रीवर्धन, २५. ब्रम्हपूरी, २६. दर्यापूर, २७. वैजापूर, २८. गोंदिया, २९. सांगोला, ३०. वर्धा, ३१. येवला, ३२. कंधार, ३३. शिरपूर-वरवाडे.

**नागरिकांच्या मागास प्रवर्गातील महिलांसाठी राखीव पदे (३४ पदे)**

१. धामणगांव रेल्वे, २. भोकरदन, ३. भगूर, ४. मालवण, ५. वरोरा, ६. हिंगोली, ७. मोर्शी, ८. उमरेड, ९. हिवरखेड, १०. बाळापूर, ११. शिरुर, १२. कुळगांव-बदलापूर, १३. देगलूर, १४. नेर-नबाबपूर, १५. धाराशिव, १६. इगतपूरी, १७. माजलगांव, १८. मुल, १९. बल्लारपूर, २०. जुन्नर, २१. कुर्डूवाडी, २२. औसा, २३. मुरुड-जंजिरा, २४. अकोट, २५. विटा, २६. चोपडा, २७. सटाणा, २८. काटोल, २९. दौंड, ३०. रोहा, ३१. देसाईगंज, ३२. पुलगांव, ३३. कर्जत, जि.रायगड, ३४. दोंडाईचा-वरवाडे.

**खुल्या प्रवर्गातील नगर परिषदांचे आरक्षित**

एकूण २४७ पैकी १३६ पदे ही खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित असून यापैकी ६८ पदे ही महिलांसाठी राखीव आहेत.

**खुला प्रवर्ग (सर्वसाधारण)**

१ फलटण, २ अहमदपूर, ३ पाथरी, ४ चाळीसगांव, ५ तळोदा, ६ वाई, ७ नांदगांव, ८ जयसिंगपूर, ९ निलंगा, १० लोहा, ११ खोपोली, १२ राजगुरूनगर १३ कराड, १४ जेजुरी, १५ उमरगा, १६ आळंदी, १७ पुसद, १८ बारामती, १९ जत, २०. पारोळा, २१ तळेगांव-दाभाडे, २२ सासवड, २३ गडचांदुर, २४ रिसोड, २५ वेंगुर्ला, २६ पातूर, २७ किल्लेधारुर, २८ चिखली, २९ मेहकर, ३० दारव्हा, ३१ सिल्लोड, ३२ सिन्नर, ३३ देवळी, ३४ मुरूम, ३५ वडगांव, ३६ महाबळेश्वर, ३७ आष्टा, ३८ दुधणी, ३९ कुंडलवाडी, ४० खुलताबाद, ४१ नरखेड, ४२ राजूरा, ४३ सिंदखेडराजा, ४४ वाडी, ४५ डहाणू, बीबी४६ देवळाली-प्रवरा, ४७ कामठी, ४८ अक्कलकोट, ४९ सातारा, ५० भोर, ५१ इंदापूर, ५२ चिपळून, ५३ माथेरान, ५४ श्रीगोंदा, ५५ श्रीरामपूर, ५६ मनमाड, ५७ नळदुर्ग, ५८ भोकर, ५९ बिलोली, ६० अंबेजोगाई, ६१ जिंतूर, ६२ सोनपेठ, ६३ गंगापूर, ६४ पांढरकवडा, ६५ घाटंजी, ६६ मुर्तीजापूर, ६७ चिखलदरा, ६८ तुळजापूर.

**खुला प्रवर्गाताली महिलांसाठी नगरपरिषदा**

१. परळी-वैजनाथ, २. मुखेड, ३. अंबरनाथ, ४. अचलपूर ,५. मुदखेड ६. पवणी ७. कन्नड, ८. मलकापूर, जि.कोल्हापूर, ९. मोवाड, १०. पंढरपूर, ११. खामगांव, १२. गंगाखेड, १३. धरणगांव , १४.बार्शी, १५. अंबड, १६. गेवराई, १७. म्हसवड, १८. गडचिरोली, १९. भंडारा, २०. उरण, २१. बुलडाणा, २२. पैठण, २३. कारंजा, २४. नांदुरा, २५. सावनेर, २६. मंगळवेढा, २७. कळमनूरी, २८. आर्वी, २९. किनवट, ३०. कागल, ३१. संगमनेर, ३२. मुरगुड, ३३. साकोली, ३४ कुरुंदवाड, ३५ पुर्णा, ३६ कळंब, ३७ चांदुररेल्वे, ३८ चांदुरबाजार, ३९ भुम, ४० रत्नागिरी, ४१ रहिमतपूर, ४२ खेड, ४३ करमाळा, ४४ वसमत, ४५ हिंगणघाट, ४६ रावेर, ४७ जामनेर, ४८ पलुस, ४९ यावल, ५० सावंतवाडी, ५१ जव्हार, ५२ तासगांव, ५३ राजापूर, ५४ सिंधीरेल्वे, ५५ जामखेड, ५६ चाकण, ५७ शेवगांव, ५८ लोणार, ५९ हदगांव, ६० पन्हाळा, ६१ धर्माबाद, ६२ उमरखेड, ६३ मानवत, ६४ पाचोरा, ६५ पेण, ६६ फैजपूर, ६७ उदगीर, ६८ अलीबाग.

**नगर पंचायतीचे आरक्षण**

राज्यातील १४७ नगरपंचायतींच्या नगराध्यक्ष पदांचे आरक्षण आज काढण्यात आले. यामध्ये अनुसूचित जातीसाठी एकूण १८ जागा आरक्षित असून यामध्ये महिलांसाठी ९ व सर्वसाधारण साठी ९ पदे आरक्षित आहेत.

तर अनुसूचित जमातीसाठी १३ जागा असून त्यामध्ये ७ जागा महिलांसाठी व ६ जागा सर्वसाधारण गटासाठी आहेत. तर नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी एकूण ४० पदे आरक्षित असून त्यामध्ये २० जागा महिलांसाठी व २० जागा सर्वसाधारण गटासाठी आहेत. खुल्या प्रवर्गासाठी एकूण ७६ जागा असून ३८ जागा महिलांसाठी व ३८ जागा या सर्वसाधारण गटासाठी आरक्षित आहेत.

**अनुसूचित जाती या प्रवर्गासाठी राखीव :–**

**महिलांसाठी आरक्षित नगरपंचायती (९ पदे)**

निलडोह, २. गोधनी (रेल्वे), ३. कोरची, ४. बहादुरा, ५. धानोरा, ६. गौंडपिंपरी, ७. ढाणकी, ८. अहेरी, ९. बेसा-पिपळा

**अनुसूचित जाती प्रवर्ग (सर्वसाधारण)**

येरखेडा, कांद्री (कन्हान), भिसी, कुरखेडा, देवरी, माळेगांव(ब्रु.), बिडगांव-तरोडी (खुर्द)-पांढुर्णा, भातकुली, दहीवडी.

**अनुसूचित जमाती या प्रवर्गासाठी राखीव :-**

महिलांसाठी आरक्षित नगर पंचायती (७ पदे)

भिवापूर, अर्जुनी-मोरगांव, सिरोंचा, हिंगणा, समुद्रपूर, पाली, देवळा.

**अनुसूचित जमाती (सर्वसाधारण) (६ पदे)**

कोरपणा, कळंब, माणगांव, गोरेगांव, सेलू , सिंदेवाही

**नागरिकांचा मागास प्रवर्ग या प्रवर्गासाठी राखीव (४० पदे) :-**

सर्वसाधारण गटासाठी आरक्षित (२० पदे)

पारनेर, तळा, खानापूर, पालम, मंठा, कोंढाळी, माळशिरस, एटापल्ली, झरी-जामणी, पोंभूर्णा, माहूर, आटपाडी, मालेगांव-जहांगिर, तिर्थपूरी, कणकवली, शिरुर-कासार, विक्रमगड, अकोले , मोखाडा, सुरगणा.

**नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित (२० पदे)**

घनसावंगी, भामरागड, मंचर, पाटोदा, माढा, कळवण, सावली, मानोरा, मारेगांव, आष्टी, जि.वर्धा, तलासरी, वडवणी, पोलादपूर, खालापूर, शिरुर-अनंतपाळ, जाफ्राबाद, चाकूर, आष्टी, जि.बीड, जिवती, कर्जत, जि.अहिल्यानगर.

**खुल्या प्रवर्गासाठी नगर पंचायती (एकूण ७६ पदे)**

**खुला (सर्वसाधारण) (३८ पदे)**

शेंदूर्णी, साक्री, सालेकसा, कवठे-महांकाळ, देवणी, मोताळा, अर्धापूर, बोदवड, हिमायतनगर, कसई-दोडामार्ग, मुलचेरा, धडगांव-वडफळ्या, कुडाळ, कोरेगांव, दापोली, वाभवे-वैभववाडी, निफाड, चंदगड, चार्मोर्शी, बदनापूर, कारंजा, धारणी, फुलंब्री, हातकणंगले, लोहारा (ब्रु.), मुरबाड, केज, आजरा, संग्रामपूर, खंडाळा, वडूज, देवगड-जमसंडे, नेवासा, मौदा, शिराळा (जि.सांगली), नायगाव, सेनगाव, महागाव.

**खुला प्रवर्गातील महिलांसाठी :- (पदे ३८)**

१. बाभुळगांव, २. मुक्ताईनगर, ३. कुही, ४. देहू, ५. शहापूर, ६. पारशिवनी, ७. वडगांव-मावळ, ८. तिवसा, ९. मंडणगड, १०. शिंदखेडा, ११. लांजा, १२. देवरुख, १३. वाडा, १४. लोणंद, १५. मेढा, १६. जळकोट, १७. दिंडोरी, १८. सडक-अर्जुनी, १९. म्हसळा, २०. नातेपुते, २१. रेणापूर, २२. लाखणी, २३. औंढा-नागनाथ, २४. पाटण, २५. पेठ, २६. कडेगांव, २७. अनगर, २८. महादूला, २९. सोयगांव, ३०. वैराग, ३१. लाखांदूर, ३२. राळेगांव, ३३. गुहागर, ३४. नांदगांव-खडेश्वर, ३५. महाळुंग-श्रीपूर, ३६. वाशी, जि.धाराशिव, ३७. बार्शी-टाकळी, ३८. मोहाडी.

**आरक्षण सोडत पारदर्शकपणे राबविली – राज्यमंत्री माधुरी मिसाळ**

राज्यातील नगरपरिषदा व नगर पंचायतीच्या नगराध्यक्ष पदांची आरक्षण सोडत प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली, असे सांगून महिला प्रवर्गासाठी आरक्षित जागांवर निवडणूक लढविणाऱ्या भगिनींना तसेच या निवडणुकीसाठी सर्वांना नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी शुभेच्छा दिल्या.

## प्रसूतीसाठी आलेल्या महिलेल्याच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी होऊन कारवाई होणार - आमदार तरे

### सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना दिले निवेदन

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०६, पालघर :** मनोर ग्रामीण रुग्णालयातील गंभीर निष्काळजीपणामुळे प्रिती जाधव (वय २२ वर्षे, धुकटण गाव) हिचा मृत्यू झाल्याबाबत तात्काळ चौकशी व जबाबदार डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई अशी मागणी बोईसर विधानसभा आमदार विलास तरे यांनी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देत जोरदार मागणी केली आहे.

दरम्यान जिल्हा प्रमुख वसंत चव्हाण उपस्थित होते. यावेळी आमदार विलास तरे म्हणाले की, धुकटण (ता. जि. पालघर) येथील २२ वर्षीय प्रिती जाधव हिला प्रसूतीसाठी मनोर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु दुर्दैवाने, या रुग्णालयातील वैद्यकीय यंत्रणा, डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या अत्यंत गंभीर निष्काळजीपणामुळे तिचा मृत्यू झाला आहे. ही घटना केवळ वैयक्तिक नाही, तर ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील भ्रष्ट, निष्काळजी व असंवेदनशील कार्यपद्धतीचे अत्यंत भयानक उदाहरण आहे.

घटनेचा तपशील अशी की, प्रीती जाधव हिला प्रसूती दरम्यान स्थिती गंभीर झाल्याने मनोर ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी उपचाराऐवजी रुग्णाला लवकर दुसरीकडे घेऊन जा असे सांगून हात वर केले. रुग्णालयात १०८ ॲम्बुलन्स तत्काळ उपलब्ध करून देण्यात आली नाही. परिणामी, रुग्णांना वेळेवर उपचार मिळू शकले नाहीत.

कर्तव्यावर असलेल्या डॉक्टर मनाली कोकाटे व डॉक्टर प्रशांत राजगुरू यांनी रुग्णाची गंभीर अवस्था पाहूनही जबाबदारी झटकत बाहेरच्या इस्पितळात हलविण्याचा सल्ला दिला, परंतु आवश्यक ती वैद्यकीय मदत व प्राथमिक उपचार न देता केवळ दुसरीकडे जा एवढ्यापुरतेच मर्यादित राहिले. गुजरात येथील इस्पितळाकडे रुग्णवाहिकेत जात असताना रस्त्यात ऑक्सिजन संपला. ऑक्सिजन सिलेंडर संपल्याने रुग्णवाहिका अर्ध्या रस्त्यातून परत आली आणि नवा सिलेंडर घेऊन पुन्हा मार्गस्थ झाली, परंतु तोपर्यंत उशीर झाला होता. रुग्णाचा अतिशय रक्तस्त्राव होऊन रस्त्यातच मृत्यू झाला आणि हे सर्व प्रशासनाच्या व डॉक्टरांच्या दुर्लक्षामुळे घडले.

यापूर्वीही सप्टेंबर महिन्यात या रुग्णालयात सर्पदंश झालेल्या रुग्णाला वेळेवर उपचार न मिळाल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. म्हणजेच ही एक अकस्मात घटना नसून, सातत्याने चालत असलेली निष्काळजीपणाची व जबाबदारी टाळण्याची प्रणाली आहे.

मनोर ग्रामीण रुग्णालय हे संपूर्ण पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण



भागासाठी आशेचे केंद्र असायला हवे होते; परंतु प्रत्यक्षात ते मृत्यूकेंद्र बनले आहे. येथे डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी हे केवळ हजेरी लावणारे कर्मचारी बनले आहेत. ना त्यांना रुग्णसेवेची भावना आहे, ना जबाबदारीची जाणीव. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून दरवर्षी कोट्यवधी रुपये निधी मिळतो; तरीही रुग्णालयात प्राणवायूची सोय, आपत्कालीन ॲम्बुलन्स, रक्त उपलब्धता, प्रसूती सुविधा या सर्व गोष्टींचा पुरवठा खंडित स्थितीत आहे.ही परिस्थिती केवळ दुःखद नाही तर फौजदारी गुन्ह्याच्या चौकशीस पात्र आहे. कारण एका निरपराध तरुण मातेला तिच्या मूलाला जन्म देताना जिवंत ठेवण्यात राज्याच्या आरोग्य यंत्रणेला अपयश आले आहे.

त्याअनुषंगाने मागण्या करण्यात येत आहेत की, प्रिती जाधव यांच्या मृत्यूच्या प्रकरणाची अधिकृत उच्चस्तरीय चौकशी आदेशित करण्यात यावी. मनोर ग्रामीण रुग्णालयातील कर्तव्यावर असलेले डॉक्टर मनाली कोकाटे, डॉक्टर प्रशांत राजगुरू व संबंधित कर्मचारी यांना निलंबित करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा.

मनोर ग्रामीण रुग्णालयातील १०८ ॲम्बुलन्स सेवा व ऑक्सिजन पुरवठा प्रणालीची सखोल चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करावी. उक्त प्रकरणी मृत प्रीती जाधव यांच्या कुटुंबाला किमान २५ लाख रुपयांची आर्थिक मदत व एका नातेवाईकास शासकीय नोकरी देण्यात यावी. पालघर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण रुग्णालयांच्या कार्यपद्धतीची विशेष तपासणी मोहीम तात्काळ राबवावी, जेणेकरून अशा घटना पुन्हा घडू नयेत. ही घटना केवळ एका रुग्णाच्या मृत्यूची नाही, तर संपूर्ण ग्रामीण आरोग्य यंत्रणेच्या अपयशाची साक्ष आहे. कडक शब्दात आमदार विलास तरे यांनी घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे.

## पूरस्थितीतील महिलांसाठी ५ लाख सॅनिटरी पॅडचे वितरण – मंत्री तटकरे

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, मुंबई :** मराठवाड्यासह राज्यातील काही भागांमध्ये पूरस्थितीत महिलांच्या आरोग्याच्या गरजांचा विचार करून त्यांच्यासाठी वैयक्तिक स्तरावर ५ लाख सॅनिटरी पॅडचे वितरण करण्यात आले आहे. तसेच सक्षम फाऊंडेशनतर्फे आणखी १० हजार सॅनिटरी पॅड पूरबाधित महिलांना देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. पुरामुळे अनेक कुटुंबांचे जगणे विस्कळीत झाले आहे. शासनामार्फत अन्न, वस्त्र व आर्थिक साहाय्य दिले जात असले तरी महिलांच्या आरोग्याशी निगडित सॅनिटरी नॅपकीनसारख्या मूलभूत गरजाही पूर्ण करण्यात येत आहेत. राज्यातील पूरग्रस्तभागातील ८ ते ९ जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना जिल्हा नियोजनाच्या राखीव निधीतून सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. महिला व मुलींच्या आरोग्य सुरक्षेसाठी सेवाभावी सामाजिक संस्थांनी पुढे येऊन पूरग्रस्त भागात मदतीचा हात द्यावा. असे मंत्री तटकरे यांनी सांगितले आहे.

## कामगार मंत्री ॲड.फुंडकरांच्या हस्ते कामगार विभागाच्या संकेतस्थळाचे मुंबईत उद्घाटन

**अक्षराज : संदीप येवले**

**दि.०६, मुंबई :** कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते कामगार विभागाच्या https://labour.maharashtra.gov.in या संकेतस्थळाचे मुंबईत उद्घाटन करण्यात आले. याचबरोबर कामगार विभागाने विकसित केलेल्या 'चॅट बोट'ला 'श्रमदूत' असे नाव देण्यात आले असून, या माध्यमातून कामगार व कारखानदारांना त्वरित मार्गदर्शन व सहाय्य मिळणार आहे.

राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या दीडशे दिवसांच्या विशेष कार्यक्रमांतर्गत कामगार विभागाने नवीन संकेतस्थळाची निर्मिती केली आहे. यामध्ये राज्यातील सर्व कारखानदार तसेच कामगार बांधवांना उपयुक्त ठरणारी विविध माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

संकेतस्थळाच्या निर्मितीसाठी कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन, उपसचिव दीपक पोकळे, उपसचिव स्वप्नील कापडणीस आणि संबंधित अधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांची मंत्रालयात आढावा बैठक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०६, मुंबई :** आरे परिसर व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यांना आवश्यक त्या मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके यांनी मंत्रालयात याबाबत आयोजित आढावा बैठकीत सांगितले.



आरे परिसरातील कुटुंबांना बजावण्यात आलेल्या निष्कासनाच्या नोटीस बाबतचा आढावाही त्यांनी घेतला. बैठकीस जोगेश्वरी (पूर्व) येथील आमदार अनंत (बाळा) नर, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या संचालिका अनिता पाटील तसेच संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.आदिवासी पाड्यांवरील कोणत्याही कुटुंबाचे हक्क बाधित न होता कायद्यानुसार प्रक्रिया पार पाडावी. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात एकूण ४३ आदिवासी पाडे आहेत. या पाड्यांवर नवीन नागरी सुविधा देण्यास उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे. मात्र, अतिक्रमित क्षेत्रातील विद्यमान नागरी सुविधांच्या दुरुस्तीस शासनाने परवानगी दिली आहे. पाड्यांवरील आदिवासी बांधवांना नागरी सुविधा मिळाव्यात, यासाठी संबंधित विभागाने उच्च न्यायालयात प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना मंत्री डॉ. वुईके यांनी दिल्या. आरे व संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी पाड्यांवरील प्रश्नांचा सखोल आढावा पुढील आठवड्यात घेण्यात येईल. असे मंत्री डॉ. वुईके यांनी सांगितले.

**थोडक्यात बातम्या**

## डहाणू तालुक्यात जिल्हा परिषद आदर्श शिक्षकांचा गुणगौरव समारंभ संपन्न



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०६, डहाणू (पालघर) :** जिल्हा परिषद पालघरच्या पंचायत समिती डहाणू शिक्षण विभागामार्फत आयोजित तालुकास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार व गुणगौरव समारंभ दिनांक ०६ ऑक्टोबर २०२५ रोजी डहाणूतील अदानी औष्णिक वीज केंद्र प्रकल्पाच्या सभागृहात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या समारंभात डहाणू तालुक्यातील विविध शाळांतील १५ आदर्श शिक्षकांचा शाल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिलेले योगदान आणि शाळांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी घेतलेले प्रयत्न याबद्दल या शिक्षकांचा विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना गट शिक्षणाधिकारी संजय वाघ यांनी केली. त्यांनी शिक्षण विभागाच्या कार्याचा आढावा घेत शिक्षकांचे अभिनंदन केले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित डहाणू विधानसभा क्षेत्राचे आमदार कॉ. विनोद निकोले यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, शिक्षक हे केवळ ज्ञानदाते नसून समाज परिवर्तनाचे प्रेरणास्थान आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आत्मविश्वास देऊन त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळवून देणे हे शिक्षकांचे मोठे कार्य आहे.शिक्षक हे समाजाचे खरे शिल्पकार आहेत, असे प्रतिपादन आमदार कॉ. विनोद निकोले यांनी केले. शासनाच्या विविध शैक्षणिक योजनांचा लाभ प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविण्यात शिक्षकांची भूमिका अत्यंत मोलाची आहे.

समारंभाला विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी, तसेच डहाणू तालुक्यातील शेकडो शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी कार्यक्रमाला अधिक रंगत आणली. कार्यक्रमाचे आयोजन आणि संयोजन पंचायत समिती डहाणू शिक्षण विभागाने केले होते. या कार्यक्रमातून शिक्षकांमध्ये एकात्मतेचा, शैक्षणिक निष्ठेचा आणि समाजसेवेच्या भावनेचा सुंदर संदेश देण्यात आला.

## वस्तू व सेवा कराची (जीएसटी) ११.८० कोटींची फसवणूक करणाऱ्यास अटक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०६, ठाणे :** महाराष्ट्र वस्तू व सेवाकर (जीएसटी) विभागाने विशेष मोहिमेअंतर्गत मे. ढोलकिया एन्टरप्राइजेस; जीएसटी क्रमांक 27AMBPD1563G1ZG या कंपनीचे प्रोप्राइटर इब्राइम असलम ढोलकिया यांना २४ सप्टेंबर २०२५ रोजी अटक केली असल्याचे माझगांव येथील राज्यकर उपआयुक्त (जनसंपर्क) जनार्दन आटपाडकर यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.

मे. ढोलकिया एन्टरप्राइजेस या व्यावसायिकाविरोधात विभागातर्फे कारवाई सुरु करण्यात आली होती. कारवाई दरम्यान सदर व्यापाऱ्याने चुकीची कर वजावट व बनावट बिजके (इनव्हॉइस) जारी करून ११.८० कोटींची महसूल हानी केल्याचे निदर्शनास आले. अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी, मुंबई यांनी आरोपी इब्राइम असलम ढोलकिया यांस ८ ऑक्टोबर २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई अन्वेषण-ब चे राज्यकर सहआयुक्त संजय पवार व राज्यकर उपआयुक्त मंजिरी फणसळकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य कर सहायक आयुक्त उमेश ब. कांबळे, प्रशांत ना. बारवे, मनीषा क्षीरसागर व राज्य कर निरीक्षक, अन्वेषण-ब, मुंबई यांनी राबवली. महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभाग सर्व समावेशक नेटवर्क विश्लेषण संसाधनांचा वापर करुन आणि इतर विभागांशी समन्वय साधून कर चुकविणाऱ्या व्यापाऱ्यांचा शोध घेत आहे. वित्तीय वर्ष २०२५-२६ मधील ही २९ वी अटक आहे.

## पुण्यात पोलिसावरच हल्ला, दोन तरुणांनी डोक्यात कोयत्याने वार केल्याने गंभीर जखमी



**दि.०६, पुणे :** पुणे शहराच्या हद्दीत दिवसागणिक होणारे खून, मारामाऱ्या या घटनांमुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असताना आता शहरात पोलिसांवरच हल्ले होऊ लागले असून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पुणे गुन्हे शाखेच्या युनिट ३ मध्ये कार्यरत असलेल्या अमोल काटकर या पोलीस अधिकाऱ्यावर शनिवारी मध्यरात्री कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. हा धक्कादायक प्रकार लॉ कॉलेज रोडवर घडला असून, काटकर सध्या सह्याद्री रुग्णालयात उपचाराधीन आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी मध्यरात्री सुमारे १ वाजण्याच्या सुमारास, पुण्यातील गुन्हे शाखेतील अधिकारी अमोल काटकर हे ड्युटी संपवून आपल्या घरी जात होते. त्यावेळी लॉ कॉलेज रोड परिसरात बाईकवरून आलेल्या दोघा अज्ञात व्यक्तींनी अचानक त्यांच्यावर हल्ला केला. आरोपींनी अमोल काटकर यांच्या डोक्यावर कोयत्याने वार केला असून या हल्ल्यात काटकर गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेनंतर परिसरात काही वेळ दहशतीचं वातावरण निर्माण झालं होतं. कोणत्या कारणातून झाला हल्ला?

पोलीस अधिकारी अमोल काटकर यांच्यावर झालेला हा हल्ला गाडीला कट मारल्याच्या वादातून झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. वाहन चालवताना झालेल्या किरकोळ वादानंतर हल्लेखोरांनी आक्रमक होत कोयत्याने वार केल्याचे सांगितले जात आहे. काटकर यांच्यावर हल्ल्याची माहिती मिळताच जवळील पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले आणि काटकर यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. सध्या ते सह्याद्री हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास डेहूरोड पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखा युनिट ३ करत आहे. घटनास्थळी असलेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असून लवकरच आरोपींना बेड्या ठोकण्यात येतील, असा विश्वास पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला आहे.